अमृत कुंभ

वर्ष १४। अंक ६। फेब्रुवारी -मार्च २१। मूल्य रु. १३/-

बार्शी – ग्लोबल टीचर पुरस्कार विजेता भ्राता रणजीतसिंह दिसले यांचा सन्मान करताना ब्र.कु. संगीता, ब्र.कु. मीरा व अन्य

नागपूर (वसंत नगर)– राष्ट्रीय किसान दिनानिमित्त वेबीनारच्या उद्घाटन प्रसंगी दीप प्रज्ज्वलन करताना ब्र.कु. रजनी, ब्र.कु. प्रेमलता ब्र.कु. प्रेमप्रकाश व अन्य

मुलुंड – पिताश्री ब्रह्माबाबांना श्रद्धासुमन अर्पित केल्यावर उभे असलेले राजयोगिनी ब्र. कु. गोदावरी दीदी, समाजसेवक भ्राता जगजीवन तन्ना, ब्र. कु. नारायण, ब्र. कु. वर्षा, भ्राता हिरालाल व भ्राता भरत

परमपिता परमात्मा त्रिमूर्ती शिवभगवानुवाच 'मन्मनाभव'।

अमृतकुंभ

अंतरंग

वर्ष १४, अंक ६. फेब्रुवारी–मार्च २०२१

मुखपृष्ठाविषयी

या विश्वातल्या असंख्य गोष्टी वर्तुळाकार गतीने फिरत आहेत, जसे– दिवस–रात्रीचे चक्र, ऋतूंचे चक्र तसेच युगांचे चक्र फिरता फिरता कलियुगाचा हा अंतिम काळ येऊन ठेपला आहे. मनुष्यात्म्यातील गुण–शक्तींच्या ऱ्हासामुळे त्याचे जीवन शुष्क आणि भेगाळलेल्या जमिनीप्रमाणे झाले आहे. अशा वेळेस शिव परमात्म्याचे दिव्य अवतरण होते आणि नव्या आशा पल्लवित होतात. मनांमनांत ज्ञानोदय होतो. सांप्रत समयी परमात्मा शिव स्वत: येऊन आपले दिव्य ज्ञान देत आहेत व मानवी जीवन उन्नत करण्याचा मार्ग दाखवित आहेत हाच संदेश या चित्राद्वारे अभिप्रेत आहे.

– प्रकाशक अमृतकुंभ

१.	संपादकीय – शिव आणि शिवरात्रीविषयीच्या जागतिक संकल्पना	२
२.	हरफन मौला – दादा विश्वरतन	५
३.	प्रभुरंगात रंगूनी...भाग ४	७
४.	विश्वाचे भाग्य विधाता (कविता)	९
५.	चिंतन	१०
६.	कोविड काळातील माझा अनुभव	११
७.	माझी पहिली मधुबन यात्रा	१३
८.	व्हावे लहानाहूनि लहान	१५
९.	ईश्वरी सेवेद्वारे कर्मबंधनातून सुटका	१६
१०.	मन नावरे नावरे	१८
११.	माउंट एव्हरेस्टच्या शिखरावर...	२०
१२.	चित्रातून चरित्रनिर्मितीकडे	२२
१३.	विदेहीपणे मुक्ती भोगीत जावी	२३
१४.	ब्रह्माकुमारी संस्थेचा रशियातील सत्संग	२६

फोटो, लेख इत्यादी पाठविण्याचा पत्ता :
संपादक – अमृतकुंभ, द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्
ए–१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी,
कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व)–४००६०३
फोन : ०२२–२५३२२२०८
E-mail : info@amrutkumbh.com

वर्गणी पाठविण्याचा पत्ता :
ब्र. कु. गोदावरी, प्रकाशक अमृतकुंभ
द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्, ए–१०, वर्षा अपार्टमेंट,
छत्रपती शिवाजी सोसायटी, कोपरी कॉलनी,
ठाणे (पूर्व) – ४००६०३ मोबाईल : ९८२००२३०९२

प्रजापिता ब्रह्मा कुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाचे मुखपत्र 'अमृतकुंभ' द्वैमासिक मुद्रक व प्रकाशक बी.के. गोदावरी यांनी परफेक्ट प्रिंट्स्, २२ ज्योती इंडस्ट्रियल इस्टेट, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे (पश्चिम) – ४००६०१ येथे छापून प्रजापिता ब्रह्माकुमारीज्, लाईट हाऊस, वागळे इस्टेट, ठाणे (पश्चिम) – ४००६०४ येथे प्रसिद्ध केले. संपादक ब्र. कु. सचिन उपाध्ये.

वार्षिक वर्गणी रु. ७५/–, आजीव सभासद वर्गणी रु. १,४००/–

E-magazine **साठी पुढील संकेतस्थळाला (वेबसाईटला) भेट द्या** – www.amrutkumbh.com.

(संपादकीय)

शिव आणि शिवरात्रीविषयीच्या जागतिक संकल्पना

अनेक ठिकाणी शिवमंदिरे थोडीशी अंतर्मुख करणारी आणि गूढ भासतात. गर्भगृह किंवा गाभाऱ्यात उतरून जाताना लागणाऱ्या पायऱ्या, आतमध्ये तेवणारा दिवा आणि सगळं वातावरणच वेगळं भासतं. अन्य देव-देवतांच्या गाभाऱ्याला बाहेरून पूर्ण प्रदक्षिणा घालतात; पण शिवलिंगाला मात्र तसं नाही करत. शिवलिंगाच्या पन्हळीपर्यंत येऊन मागे परतायचे, ओलांडायचे नाही. देव-देवतांना सुगंधी फुलं अर्पण करतात. पण शिवलिंगाला धोतऱ्याचे विषारी फूल वाहतात. शिव आणि शिवलिंग म्हटलं की सगळंच वेगळ्या रुढीचं असतं आणि शिवाचे व्रतही कडक मानले जाते.

कौटिल्याने अर्थशास्त्रावर विपुल लिखाण केले आणि त्यात दुर्ग म्हणजे किल्ल्यांबाबत एक दीर्घ प्रकरणच आहे. त्यात दुर्गांवर शिवमंदिर असावं असा उल्लेख सापडतो. 'लिंग' शब्द शारीरिक पातळीवर असलेल्या स्त्रीलिंग, पुल्लींगाशी संबंधित नसून त्याचा अर्थ 'चिन्ह' असाच आहे. याला अनेक संदर्भ सापडतात. वेदान्त सूत्रांत बारापेक्षा अधिक वेळा लिंग म्हणजे चिन्ह या अर्थी शब्द येतो, ब्रह्मसूत्रातही तसेच उल्लेख सापडतात. 'न्याय दर्शन' नावाच्या ग्रंथात म्हटले गेले आहे, 'एकाच वेळी अनेक वस्तुंचे ज्ञान न होणे हे मनाचे लिंग अर्थात चिन्ह आहे.' काही अभ्यासकांच्या मते 'ली' म्हणजे अव्यक्त किंवा निराकार आणि गम (गमक) म्हणजे चिन्ह होय. शिव म्हणजे कल्याणकारी आणि शिवाला परमात्मा म्हटले आहे. शिव निराकार आहे आणि निराकाराविषयी आपला भक्तिभाव प्रकट करण्याचे व्यक्त रूप म्हणजे शिवलिंग. परमात्मा किंवा परमेश्वर कुणाला म्हणायचे? त्याचे सत्य रुप काय? कुणी रामाला ईश्वर मानतो कुणी कृष्णाला, कुणी निसर्ग म्हणजेच परमेश्वर समजतो.

नक्की ईश्वर कुणाला म्हणायचे यासाठी खालील निकष विचारात घेऊया.

१) **जो सर्वमान्य म्हणजे सर्वांना मान्य आहे अशी सत्ता किंवा शक्ती म्हणजे ईश्वर किंवा परमात्मा.**

२) **जो सर्वोच्च, सर्वोत्तम, सर्व श्रेष्ठ आहे तो परमेश्वर.**

३) **जो अलिप्त (न्यारा) आहे, कशापासून? जन्म-मरणापासून, कर्मफळापासून, सुख-दुःखापासून इ.**

४) **जो सर्वज्ञ आहे अर्थात् ज्ञानसागर आहे.**

५) **जो गुण व शक्तींचा अक्षय सागर आहे.**

६) **जो स्वयंभू आहे म्हणजेच जो सर्वांचा मात-पिता आहे; पण त्याचा कुणी मात-पिता नाही असा सर्व सर्वशक्तिवान.**

या निकषांवर मनन केल्यास जाणवते-परमेश्वराविषयी 'निराकार' ही एकच कल्पना ग्राह्य वाटते. ज्याला देह आहे त्याला जन्म आणि मृत्यू, कर्म आणि कर्मफल बाध्य करते. ज्याला कर्म आणि कर्मफल बाध्य करते त्याला सत्व, रज, तम अवस्थांतून जावे लागते. म्हणजेच कुठलाही देवात्मा, महात्मा, धर्मात्मा या निकषांवर पूर्णपणे तोलता येत नाही. अनेक धर्मात, पंथात परमेश्वराला निराकारच संबोधले आहे. इस्लाममध्ये म्हटले आहे 'अल्लाह नूरका (प्रकाशाचा) पुतला है म्हणजे प्रकाश आहे'. येशूने म्हटले आहे - गॉड इज लाइट म्हणजे परमेश्वराचे रूप प्रकाशमय आहे किंवा तो प्रकाशस्वरुप आहे. शीख पंथात 'एक ॐकार' म्हटले आहे. भारतात बारा ज्योतिर्लिंगे प्रसिद्ध आहेतच; पण प्रत्येक गावात

एक तरी शिवमंदिर आढळते. इतिहासकालीन दाखले चाळले तर राजा विक्रमादित्यापासून, महाराणा प्रताप, शिवाजी महाराज, महाकवी कालिदास, गानसम्राट तानसेन अशी अनेक शिवभक्तांची उदाहरणे सापडतात.

भारत देशाबाहेरही असंख्य संदर्भ सापडतात. जगातल्या अनेक देशांत शिवलिंगाचे किंवा निराकाराचे प्रतीक म्हणून शिवलिंग स्थापल्याचे उल्लेख सापडतात. भाषा वेगवेगळ्या आहेत; पण त्यामागचा भाव तोच आहे, गर्भितार्थही तोच आहे. काही मोजकीच उदाहरणे पाहूया. जगातल्या वेगवेगळ्या कोपऱ्यात शिवलिंगाचे अवशेष सापडले आहेत.

१) इंडोनेशियातल्या जावा सुमात्रा बेटांवर शिव महिमा गायला गेल्याचे उल्लेख आहेत.
२) इस्रायलमध्ये एक प्रसिद्ध शिवलिंगाकार आहे. त्याला स्पर्श करून प्रतिज्ञा करण्याची प्रथा आहे.
३) जपानमधल्या 'होन्शु' बेटावरील समुद्राकाठी वसलेल्या 'आईस' (Ise) नावाच्या शहरात शिवाचे गायन पूजन होत असे.
४) अफगाणिस्तानातल्या, बाल्ख (बल्ख), चित्राल, बुखारा, स्वात अशा अनेक प्रांतात शिवाची 'चंचेश्वर' या नावाने पूजा होत असे, असे उल्लेख सापडतात.
५) स्कॉटलंडमधील ग्लासगोमध्ये स्वर्णजडित मोठे शिवलिंग होते असे वर्णन आढळते.
६) ब्राझीलसारख्या देशात शिवलिंगाचे अवशेष मिळाल्याचे उल्लेख सापडतात.

श्रीलंका, मॉरीशस, म्यानमार, थायलँड, इटली, ऑस्ट्रीया, हंगेरी, सायबेरिया अशा अनेक ठिकाणी शिवलिंगाकाराचे अवशेष किंवा संदर्भ सापडतात. (आधारः 'पृथ्वी प्रदक्षिणा', ज्ञान मण्डल काशी आणि गीता प्रेस गोरखपूर द्वारा प्रकाशित विशेषांक)

जगभरातल्या अनेकानेक संस्कृतींवर शिव उपासनेचा प्रभाव होता हे दिसून येते. आपापल्या भाषेत त्या काळात निराकार शिव या संकल्पनेचा स्वीकार केल्याचे आढळते. वानगीदाखल काही मोजक्या गोष्टी पाहूया.

१) बॅबिलॉनियन राज्यसत्तेची राजधानी बॅबिलॉन होती. तिथे शिवलिंगाला 'शिउन' म्हटले जाई.
२) इजिप्त मध्ये शिवलिंगाचे नाव सेवा (शिवा?) होते.
३) ऑस्ट्रलियाजवळ असलेल्या फिजी बेटावर 'सेवा किंवा सेवाजिया' नावाने पूजा होत असे.
४) रोम, इटलीत शिवाला 'प्रियपस' नावाने संबोधले जाई. काहींच्या मते गिरिजा म्हणजे पार्वती आणि गिरिजाघर म्हणजे चर्च हे नावही या जुन्या संदर्भातूनच आले आहे.
५) प्रसिद्ध इतिहासकार कर्नल टॉडने लिहून ठेवले आहे, ''ग्रीकांच्या इतिहासकाळात शिवाचा उल्लेख 'फल्लूस' असा केला जाई. 'फल्लूस' म्हणजे 'फलेश' अर्थात् फळ देणारा किंवा कर्मफळ देणारा असे टॉडचे म्हणणे आहे.
६) चीनमध्ये 'हुवेड-हिफुह' म्हटले जाई. याच नावाने आराधना केली जाई. थायलँडमध्ये 'एकोनिस' आणि 'एस्टरगॅरीस' नावाने शिवलिंग पूजले जाई. यहुदी त्यास 'बेलफेगो' म्हणत. शोधू पाहता असे अनेक संदर्भ सापडतील.

तात्पर्य : परमेश्वर निराकार आहे आणि त्याच्याविषयी भाव प्रकट करण्याचे स्थूल माध्यम म्हणून ज्योतीच्या किंवा अंगुष्ठाकाराच्या आकाराची शिवप्रतिमा निर्माण केली गेली. तिचे गायन पूजन आपापल्या पद्धतीने जो तो आपापल्या प्रांतात करत असे.

भाषेच्या आधारे शोधू पाहता असेच आश्चर्यजनक संदर्भ हाती येतात. हजरत मुहम्मद पैगंबरसाहेबांचे काका 'उमर बिन हश्याम' नावाचे प्रसिद्ध ईश्वरभक्त होते. त्यांचे एक अरबी भाषेतील काव्य 'से अरुल ओकुल' नावाच्या काव्यसंग्रहात प्रसिद्ध झाले आहे. त्यातील २३५ व्या पृष्ठावर प्रकाशित काव्यातील एकच कडवं येथे देत आहोत.

व अहालोलहा अजहू अरामीमन महादेव ओ।
मनोजेल इलमुद्दीने मीनहुम व सयत्तरु

याचा अर्थ – जर खऱ्या अंतःकरणाने कुणी महादेवाची पूजा करेल त्याला अध्यात्ममार्गात सर्वोच्च पद प्राप्त करता येईल. येथे 'महादेव' शब्दाचा भारतातील प्रचलित अर्थच अभिप्रेत आहे.

आता सुरूवातीच्या पाच-सहा निकषांकडे दृष्टी टाकल्यास जाणवेल की सर्वमान्य अशी जगभरातील निराकाराची संकल्पना परमात्मा शिवालाच लागू होते.

असा हा निराकार शिव जेव्हा धरतीवर दिव्य रीतीने अवतरित होतो तेव्हा रात्र असते. त्या रात्रीचे गायन पूजन शिवरात्रीच्या रूपात होते. मात्र आध्यात्मिक पातळीवर विचार केल्यास जाणवते, चोवीस तासातल्या दिवस-रात्रीतील ही रात्र नसावी. ही रात्र व्यापक अर्थाने कलियुग, अज्ञान (ईश्वराविषयीचे अज्ञान) रूपी रात्र आहे. इस्लाममध्ये यालाच समांतर म्हणता येईल अशी 'शबेरात' आहे. काही ठिकाणी त्याचा उल्लेख 'शब-ए-बारात' असाही सापडतो. 'शब' म्हणजे रात्र आणि ही रात्र 'बेहद फजीलत' म्हणजे अतिशय महत्त्वपूर्ण मानली जाते. असे म्हणतात की या दिवशी किंबहुना रात्री म्हणूया, 'इबादत' म्हणजे ईश आराधना करून आपल्या दुष्कृत्यांची माफी मागितल्यास त्याचे अवश्य काही पट अधिक फळ मिळते. अनेक जण या दिवशी दानधर्म करतात. पवित्र ग्रंथ कुराणाचे पठणही करतात. याचा परिपाक विशेष पुण्यप्राप्तीत होतो असे मानले जाते.

एवढ्या चर्चेनंतर सहजपणे म्हणता येईल की ईश्वर एकच असून तो निराकार आहे. निराकार म्हणजे कुठलाही आकार नाही आणि म्हणून तो सर्वव्यापी आहे अशी समजूत करून घेण्यात मात्र अर्थ नाही. निराकार म्हणजे मनुष्यासारखा त्याला देहाकार नाही. अशा ज्योती स्वरुपाविषयी जगभरातील संकल्पना नीट समजून घेतल्यास धार्मिक समजुतींच्या आधारे असलेले भेदभाव नष्ट करण्यास मदत होईल. जर आपण मनुष्यात्मे एकाच परमेश्वराची मुले आहोत तर आपसांतील नाते खऱ्या अर्थाने भावा-भावाचे आहे हे जाणवू लागेल. 'वसुधैव कुटुम्बकम्' ही संकल्पना कागदावरच न राहता जीवनात धारण करता येईल. असा आध्यात्मिक अर्थ जीवनात आचरणे म्हणजे खऱ्या अर्थाने शिवरात्र साजरी करणे सार्थ होईल यात शंकाच नाही.

ब्रह्माकुमारी संस्थेच्या नियमित विद्यार्थ्यांव्यतिरिक्त इतरांना निराकाराची आठवण कशी करायची अथवा राजयोग शिकायची इच्छा असल्यास जवळच्या सेवाकेंद्रावर राजयोगाचे मोफत शिक्षण मिळू शकेल. परमात्मा शिवाच्या दिव्य अवतरणातून प्राप्त झालेले ज्ञान संस्थेमार्फत दिले जात आहे.

***

महाभारतातील बोधप्रद यक्षप्रश्न

प्रश्न - मनुष्याला मिळणारा सर्वोत्तम लाभ कोणता ? आणि सर्वोत्तम सुख कोणते ?

उत्तर - निरोगी शरीर हा माणसाला मिळणारा सर्वोत्तम लाभ होय. कुठल्याही परिस्थितीत आनंद मानण्याची क्षमता असेल तर त्याच्यासारखे सुख जीवनात नाही.

***

सूचना : अमृतकुंभच्या नववर्षाची सुरूवात एप्रिल २०२१ पासून होत आहे. त्याची वार्षिक वर्गणी मागील वर्षाएवढीच रू. ७५/- ठेवली आहे. तसेच आजीव सभासद वर्गणीही न वाढविता रू. १४००/- इतकीच ठेवली आहे. सर्व वर्गणीधारकांनी नववर्षाची वर्गणी भरून आपले सदस्यत्त्व चालू ठेवावे ही विनंती. तसेच सेवाकेन्द्राच्या टीचर बहिणींनी लवकरात लवकर सदस्य संख्या कळवावी.

हरफन मौला - दादा विश्वरतन

ब्र. कु. हेमंतभाई, शांतिवन

३-४ तासांच्या नाटकातील रंगमंचावर अनेक कलाकार विविध कलांचं प्रदर्शन करून प्रेक्षकांच्या डोळ्यांचं पारणं फेडतात. परंतु त्यातील काही मोजकेच प्रत्येक कलेमध्ये पारंगत असतात. अशा हरहुन्नरी कलाकारांना 'हरफन मौला' असं म्हटलं जातं. त्यांच्यासाठी कुठलेही काम हे डाव्या हाताचा खेळ असते. 'दादा विश्वरतन' हे असेच 'हरफन मौला' होते. प्रत्येक कर्मात निपुण, प्रवीण असं दादांचं अष्टपैलू व्यक्तिमत्त्व होतं. पिताश्री ब्रह्माबाबा त्यांना जी यज्ञसेवा देत ती सेवा करायला ते सदैव तत्पर असत व बाबांच्या प्रत्येक आज्ञेला त्यांचा होकार असायचा. 'नाही' व 'अशक्य' हे दोन शब्द दादांच्या शब्दकोशात कधीच नव्हते. बाबा त्यांना प्रेमाने 'बच्चु' संबोधत. बाबा म्हणायचे, ''बच्चु पहारेकरी बनून सेवा करशील? दादा म्हणत 'हाँ जी बाबा'.

'बच्चु, भाजी आणायला जाशील का?' दादा म्हणत 'हाँ जी बाबा!'

'बच्चु भांडी घासशील?' दादाचं उत्तर, 'हाँ जी' असे.

'बच्चु दवाखाना सांभाळशील? गाइड, गार्ड बनशील?' बाबांची प्रत्येक आज्ञा दादांसाठी 'शिरोधार्य असे'. सेवेद्वारे सर्वांना सुख देऊन सर्वांचं मन त्यांनी जिंकले होते. त्यामुळे ब्रह्माबाबा त्यांना 'सुखदेव' म्हणत. बाबांच्या यज्ञसेवेत तनामनाने समर्पित होऊन दादा जणू दधिची ऋषीच झाले होते.

दादांचा जन्म सिन्ध प्रांतातील भिरीया (तालुका : नौशेरो, जिल्हा नवाबशाह) येथे दि. १८/३/१९१८ रोजी झाला. आई-वडिलांनी त्याचं नाव ठेवलं 'वरियल' आणि शिवबाबांनी अव्यक्त नाव दिलं 'विश्वरतन'! वडील प्राथमिक शाळेतून सेवानिवृत्त झाले तेव्हा दादांच्या चुलत भावाने (हे कराची येथे शाळांचे निरीक्षक होते) वडिलांना कराचीमध्ये शिक्षकाची नोकरी देऊ केली आणि दादा आपल्या वडिलांबरोबर कराचीला गेले. तिथे 'ओममंडळी' बद्दल (१९३६-४० च्या दरम्यान ब्रह्माकुमारी संस्थेला ओममंडळी या नावाने ओळखले जात होते) वर्तमानपत्रांमध्ये अनेक उलट-सुलट बातम्या छापून येत असत. हे नक्की काय आहे? असं कुतूहल दादांच्या मनांत जागृत झालं व ओममंडळीशी पत्राद्वारे संपर्क करून रीतसर परवानगी घेऊन दादा ओममंडळीत दाखल झाले. दरवाज्यातील पहारेकऱ्याला पत्र दाखवले. तेवढ्यात दरवाज्याजवळ एक कार येऊन थांबली. त्यातून पिताश्री ब्रह्माबाबा उतरले व आत गेले. बाबांचं अलौकिक व्यक्तिमत्त्व बघून दादांच्या मनात विचार आला, 'लोकं ह्या व्यक्तीबद्दल उलट-सुलट बोलू तरी कसं शकतात?' इतक्यात त्यांना आत बोलावण्यात आलं. त्यादिवशी शांतामणी दादींच्या बहिणीने जसुदादीने त्यांना आत्म्याविषयी ज्ञान दिले. दुसऱ्या दिवशी सीतू दादींनी परमात्म्याचा परिचय दिला. ज्ञानार्जन करताना असीम शांतता व आनंदाची अनुभूती झाली. विकारी जगतापेक्षा ओममंडळीतील पवित्र वातावरणाने दादा ह्या मार्गाकडे आकर्षित झाले व वर्तमानपत्रातील बातम्या खोट्या आहेत ह्याची खात्री पटली. रोज ओममंडळीमध्ये जाऊ लागले.

कराचीमध्ये असताना बाबांच्या आज्ञेनुसार ज्ञानमुरलीचे काही ज्ञानबिंदू काढून त्याचे इंग्रजीत भाषांतर करून त्याची एखादी पुस्तिका बनूवन ती तत्कालीन मंत्र्यांना देत असत.

मातेश्वरींकडे निवेदन करून ते दि. २५/१२/१९३९ यादिवशी यज्ञसेवेत समर्पित झाले. मम्मांनी त्यांना क्लिफ्टन वर बाबांच्या जवळ असलेल्या बंगल्यामध्ये रहायला पाठवले. शिकरापूरची एक माता सकाळच्या गरम पाण्याची व्यवस्था सांभाळत असे. दादा पहाटे लवकर उठत. त्या माताजींना सहयोग देण्याच्या उद्देशाने स्वतःहूनच पाणी गरम करून देण्याची सेवा करू लागले. ही गोष्ट जेव्हा बाबांच्या कानावर पोहोचली आणि बाबा खुश झाले. बाबांनी त्यांना सदर बाजारातून मिल्क क्रिम खरेदी करून बहिणींना देण्याची सेवा दिली. दादांचे वर्तन कसे आहे याचा वृत्तांत बहिणींकडून बाबांना समजत असे. अर्थातच तो चांगला असल्याने बाबांच्या हृदयात त्यांनी स्थान मिळवले. बाबांनी त्यांना भाजी आणण्याची सेवा दिली. सायकलच्या कॅरिअरवर भाजीच्या ६-६ गोण्या लादून ६ मैल दूरून आणत व मुरलीच्या वेळेच्या आत बरोबर पोहोचत असत. ह्या वरून त्यांची मुरलीबद्दलची ओढ व कामातील अचूकता व वेळेची कदर दिसून येते.

अँटी ओममंडळीने बाबांच्या विरोधात हंगामा सुरू केला होता. बाबांनी पोलिसाच्या वेशात पहारा देण्याची सेवा दादांकडे सोपविली होती. एकदा असं झालं भोली दादींच्या पतीने बाबांवर कोर्ट केस केली व बाबांच्या नावाने वॉरंट निघाले हे बाबांना आधीच समजले होते. बाबांनी विश्वकिशोर भाऊंना स्टे ऑर्डर आणण्यासाठी कोर्टात पाठविले व इकडे दादांना पहाऱ्यावर बसवले. बाबांना नेण्यासाठी पोलिस जेव्हा वॉरन्ट घेऊन आले तेव्हा दादांनी युक्ती वापरुन पोलिसांना बाहेरच तिष्ठत ठेवले. तोपर्यंत विश्वकिशोर भाऊ कोर्टातून 'स्टे ऑर्डर' घेऊन आले व ती दाखवल्यामुळे पोलिसांना हात हलवत माघारी जावं लागलं. दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात बातमी छापली गेली की ओममंडळीच्या कठोर पोलिसाने पोलिस इन्स्पेक्टरला देखील परत पाठविले.

हळूहळू अँटी ओममंडळींचा विरोध कमी झाला. मग बाबांनी दादांना पहारेकऱ्याच्या सेवेतून मुक्त करून बॉईज भवनमध्ये मुलांचा शिक्षक बनवले. तिथे दादा त्यांना शालेय अभ्यासाबरोबर खेळसुद्धा शिकवत. नंतरच्या काळात बाबांनी त्यांना धोबी घाटाचं कार्य सोपविले. सकाळी लवकर उठून कपडे भट्टीत टाकायचे नंतर कपडे धुवून सुकवून दुपारी कपड्यांना इस्त्री करत. ह्याच कालावधीत दादांनी केशकर्तनाची कला शिकून बाबांची दाढी करणे व केस कापणे इ. सेवासुद्धा केली. एके दिवशी बाबांनी ध्यानावस्थेत मानववंश वृक्ष बघितला व दादांना विचारलं, 'बच्चु ऐसा झाड का डिझाइन बनाओगे?' दादांनी लगेच 'हाँ जी बाबा' म्हटले. बाबांनी मम्माला, 'दादांच्या इतर सर्व सेवा कमी करायला सांगितलं व त्यांना कागद, ब्रश, रंग हे सर्व देऊन एक स्वतंत्र खोली दिली. दादांनी पेन्सिलने एका वृक्षाचे छान चित्र काढले. जमिनीखालची झाडाची मूळं दाखवली तिथे (संदेशी बहिणीने आणलेल्या नावामध्ये ज्यांची नावं होती) दीदी मनमोहिनी, विश्वकिशोर भाऊ, दादी प्रकाशमणी, दादी बृजेंद्रा, दादी शांतामणी, दादी बृजशांता, ध्यानी दादी, व दादा विश्वरतन ह्या आठ रत्नांचे फोटो टाकले. वरती सुरुवातीस जाड व नंतर निमुळते होत गेलेले चार युगांचे खोड दाखवले. त्याच्या दोन्ही बाजूला इब्राहीम, ख्राइस्ट, बुद्ध, गुरुनानक हे धर्म फांद्यांच्या रुपात व फळांच्या रूपाने त्यांच्या अनुयायांचे चेहरे दाखवले. अशाप्रकारे साप्ताहिक कोर्सच्या अन्य चित्रांच्या निर्मितीमध्येही दादांचा सिंहाचा वाटा आहे.

पुढे भारत-पाकिस्तान फाळणीनंतर ओममंडळी आबूमध्ये स्थानांतरीत झाली. सुरूवातीला संस्था बृजकोठी व नंतर पांडवभवन (पोकरान हाऊस) येथे स्थिरावली. बृजकोठी येथील जाण्या-येण्याचा रस्ता पावसाळ्यात खराब होत असे. त्याची दुरुस्ती करण्यामध्ये सुद्धा दादांचा सहभाग होता. यज्ञात आर्थिक चणचण (बेगरी पार्ट) सुरू झाली होती. बाबांनी दादींना ईश्वरी संदेश देण्यासाठी पूर्ण भारत भ्रमणास पाठवले होते. मिठ्ठू दादींची दवाखाना सांभाळण्याची जबाबदारी दादांकडे आली. हळूहळू सुतारकाम व वीजेचं कामं बघणारे यज्ञवत्स सेवार्थ अन्यत्र गेल्यावर कारपेंट्री व वीजविभाग सुद्धा दादांनी सांभाळला. त्यातसुद्धा दिवसभर

(पान क्र. १२ वर)

प्रभू रंगात रंगूनी (भाग – ४)

'नन बट वन' सर्व आत्म्यांचा पिता-एक 'शिव' परमात्मा

ब्र. कु. मिनल, ठाणे (प.)

आफ्रिका खंडातील ब्रह्माकुमारीजच्या सेवाकेंद्रांच्या संचालिका, राजयोगिनी ब्र. कु. वेदांती दीदी साकार ब्रह्माबाबांकडून संगोपन मिळालेल्यांपैकी विदेश सेवेतील आदि रत्नांपैकी एक आहेत. त्यांनी अनेकांना ईश्वरी मार्गावर चालण्याकरिता दीपस्तंभ बनून, संपूर्ण वारसा घेण्याची प्रेरणा दिली. आफ्रिकन वंशाच्या ब्र. कु. एलिजाबेथ या त्यांपैकीच एक. त्यांचा जीवनानुभव इथे देत आहोत.

'ओमकार स्वरूपा सद्गुरू समर्था, अनाथांच्या नाथा तुज नमो...' सुरेश वाडकरांच्या आवाजातील हे गीत नादमाधुर्यामुळे आजही आवडीने ऐकले जाते. सत्य, चैतन्य, आनंदस्वरूप असलेल्या परमात्म्याची महती गावी तेवढी थोडीच आहे. तो शांतीचा सागर, करुणेचा सागर, मुक्ती-जीवनमुक्तीदाता, मार्गदर्शक, सर्वांचा एक पिता परमेश्वर आहे. परमात्मा पवित्रतेचा सागर, सदैव पूज्य, पतित-पावन आहे. आपण मनुष्यात्मे त्याचा अंश नसून त्याची लाडकी मुलं आहेत. सुख, शांती, आनंद, प्रेम, पवित्रता आपलाही स्वधर्म आहे. प्रत्येक आत्म्याने धारण केलेल्या मनुष्य शरीराचं रंग, रुप, नाव, देश, धर्म इ. वेगवेगळं असलं तरी अंतरात्मा एक ज्योतीर्बिंदूरूप आहे. मंदिर, मशीद, चर्च, गुरुद्वारा प्रार्थनास्थळं अनेक असूनही पिता परमात्म्याला निराकार ज्योतीस्वरुपातच पूजलं जातं. 'नूर-ए-इलाही' कुणी 'God is Light' म्हणतात तर भारतात सर्वत्र ज्योतिर्लिंग देवस्थान अर्थात् शिवमंदिर पहायला मिळतंच.

भारतीय तत्त्वज्ञानाचा, हठयोगाचा प्रभाव संपूर्ण विश्वात पसरलेला आहे. 'आपण कोण आहोत, कुठून आलो, कुठे जायचे आहे, जीवनाचे सार्थक कशात आहे' या आणि अशा अनेक प्रश्नांची उकल करण्यासाठी जगभरातील मंडळी भारतीय संस्कृतीकडे, तत्त्वज्ञानाकडे मोठ्या उत्सुकतेने पाहत असतात. आफ्रिका खंडातील केनिया देशातील एका छोट्या गावात शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या एलिजाबेथला लहानपणापासून चर्चमध्ये प्रीस्ट बनायचं होतं; पण ख्रिश्चन धर्मात स्त्रीला प्रीस्ट होता येत नाही म्हणून त्यांच्या वडिलांनी त्यांना एका कॉन्वेंटमध्ये दाखल केलं. तिथे राहून १२ वर्ष त्यांनी 'नन' होण्याचं शिक्षण घेतलं कॉलेजमधून मेडिकल लॅब तंत्रज्ञानाचं शिक्षण पूर्ण झाल्यावर त्याच कॉन्वेंटमध्ये परतूनही त्यांचं मन रमेना. 'हे स्थान (ठिकाण) माझ्यासाठी नाही' असेच विचार मनात पिंगा घालत राहायचे. नैरोबी शहरात आल्यावरही ईश्वराशी निरंतर संवाद सुरूच असायचा. 'हे प्रभू, मला योग्य रस्ता दाखव. नन होऊन मला आयुष्यभर राहायचं नाही. मी कुठे जाऊ? कोण मला मार्गदर्शन देईल?' अशातच एकदा स्वप्नात त्यांनी सफेद वस्त्र (साडी) नेसलेल्या स्त्रियांना पाहिलं. वाटलं या दुसऱ्या धर्मातील आहेत. नन नव्हेत. निश्चय केला त्यांच्याकडे जायचं नाही. पण कसचं काय. प्रार्थना करताना आध्यात्मिक पुस्तकातून टिपणं काढताना पुन्हा पुन्हा त्याच दिसत राहिल्या.

ही गोष्ट आहे १९८१ सालातील. ब्रह्माकुमारीजतर्फे 'मनाची शांती' विषयावर नैरोबीमध्ये एक सभा आयोजित करण्यात आली होती. सिस्टर एलिजाबेथ यांना जेव्हा हे समजलं तेव्हा त्यांनी तिथे जायचं ठरवलं. दादी प्रकाशमणीजी

भारतातून खास तिथे उपस्थित होत्या. आपल्या स्वप्नात येणाऱ्या भारतीय भगिनी याच आहेत, याची सिस्टरना ओळख पटली; पण या भारतीय आणि आपण कॅथॉलिक ख्रिश्चन धर्माच्या. कसा मेळ जुळावा? तरीही याच आपल्याला ईश्वराचा सत्य मार्ग दाखवतील असा विश्वास वाटू लागला. मनांत द्वंद्व सुरू झालं. काय करावं? तिथे एक बिशपही आले होते. सिस्टरनी दुसऱ्या दिवशी त्यांची भेट घेऊन बी. के. विषयी त्यांचं मत विचारलं. ही चांगली संस्था असून तुम्ही संपर्कात राहू शकता असं बिशपनी सांगितल्यावर सिस्टरनी ईश्वरी ज्ञानाचा कोर्स आरंभ केला. आत्मा, परमात्मा, सृष्टिचक्राविषयी जे जे सांगितलं गेलं ते कॉन्वेंटमध्ये परतून 'त्या' बायबलमध्ये त्याचे संदर्भ शोधत असत. हळूहळू सत्य ईश्वरी ज्ञानावर पूर्ण विश्वास बसला. आता प्रश्न होता अन्नशुद्धीचा. नन्सना हॉस्टेलमध्ये शाकाहारी भोजनही मिळत नसे. विशेष विनंती करून त्यांनी पूर्ण शाकाहारी जेवण सुरू केले. राजयोगाच्या नियमित अभ्यासाने नाजूक स्वभाव बदलून त्या कणखर बनल्या.

नन्स कॉन्वेंटमध्ये दाखल झाल्यापासून १२ वर्षात एकदाही त्या घरी गेल्या नव्हत्या. आता ब्रह्माकुमारी जीवन जगण्यास प्रारंभ केल्यानंतर त्या जेव्हा घरी गेल्या तेव्हा वडिलांनी त्यांच्या नातेवाईकांना, मित्रमंडळींना बोलावून समारंभ साजरा केला. त्यात त्यांच्या प्रथेप्रमाणे मटणाचं जेवण ठेवलं होतं. सिस्टर एलिजाबेथनी ते स्वीकारण्यास नकार दिला. त्यांनी ननचाच पोशाख घातला होता तरी मनापासून ईश्वरी ज्ञान स्वीकारलं होतं. एका पाहुण्याने आक्षेप घेतला. तू हिंदू धर्म स्वीकारला आहेस, मांस खात नाहीस. असे आरोप वाढत गेले. 'मी धर्म बदललेला नाही फक्त मांसाहार करणं सोडलं आहे' असं परोपरीने सांगूनही कुटुंबाचा विश्वास बसेना. 'तू हिंदू धर्माची दीक्षा घेतली नसशील तर ते मांस खाऊन सिद्ध करून दाखव, तरच आम्ही मान्य करू.' पाहुणे मंडळीही जिद्दीला पेटली. ती इतकी माणसं आणि या एकटया. 'बाबा 'मेरे तो आप ही गिरीधर'. अशा परिस्थितीत मी काय करू? बाबा आता तुम्हीच मला मदत करा' मनोमन शिवबाबांशी संवाद साधला आणि एक युक्ती सुचली. उपस्थितांना खूश करण्यासाठी मांसाचा छोटा तुकडा उचलून तोंडात टाकला व पाणी पिण्याच्या निमित्ताने हळूच रुमालात काढून लपवून ठेवला. झालं, सगळ्यांची शंका दूर झाली; पण प्रकरण इतक्यात संपायचं नव्हतं. पुढच्या रविवारी नातेवाईकांनी बैठक बोलवायचं ठरवलं. कॉन्वेंट का सोडलं? याचं उत्तर हवं होतं आणि त्यानिमित्ताने त्यांचं लग्न ठरवायचा बेत आखला जात होता. ही खरी धोक्याची घंटा होती. मन म्हणत होतं आता इथे (वडिलांकडे) राहणं बरोबर नाही. इथून निघायला हवं. **मंडळी विचार करा, आपल्या देशातही धर्म, जातीपातीची बंधन इतकी जाचक आहेत, मग ती तर सर्वस्वी वेगळ्या संस्कृतीतली माणसं. त्यांच्या प्रथा, परंपरा, राहणीमान सारंच निराळं. असं असूनही आत्म्याला जेव्हा परमात्म्याची ओळख पटते तेव्हा दुनियेची सगळी बंधने गळून पडतात. सिस्टर एलिजाबेथनीही तेच केलं. आपल्या भावाला पत्र लिहिलं 'मी आता घरात राहू इच्छित नाही. मला ब्रह्माकुमारीज्च्या सेंटरवर राहायचं आहे.' दुसऱ्याच दिवशी कोणालाही न कळू देता त्या नैरोबीला वेदांती दीदींकडे सेंटरवर गेल्या. 'बाबा मी आता तुमच्या घरी (सेंटरवर) आले आहे. पुढे जे होईल ते तुम्ही सांभाळून घ्या.' मनांत फक्त एक बाबा आणि ईश्वर समर्पित जीवनाची ओढ होती.**

वेदांती दीदी क्षणभर आश्चर्याने पाहत राहिल्या. सिस्टर एलिजाबेथचं स्वागत करून त्यांना सफेद (बी.के.) ड्रेस दिला. ननचे कपडे उतरवून त्यांनी ती वस्त्र परिधान केली ती कायमची. 'घरी न सांगता तू अशीच निघून आलीस, तेव्हा ते तुझा पाठलाग करतील. त्यांना कळवून टाक' वेदांती दीदींनी मोलाचा सल्ला दिला. यावर एलिजाबेथ म्हणाल्या, 'आमच्या जमातीमध्ये कुणी घरातून पळून गेलं तर त्यांचा शोध घेत नाहीत, तसंच त्यांना पुन्हा घरात प्रवेशही देत नाहीत. दीदी तुम्ही निश्चिंत असा.' त्यानंतर त्या सेंटरवरच राहिल्या. १९८३ मध्ये प्रथम आंतरराष्ट्रीय कॉन्फरन्ससाठी त्या आबूला आल्या. आपण अशा आफ्रिकन

देशात का आहोत, भारतात का नाही? विचार करून त्यांना खूप रडू आलं. परमात्मा पिता आहे ना आपला, तो सर्व जाणतो. मुलं उदास झाली तर शिवबाबांना ते कसं आवडेल? गुलजार दादींच्या तनात अव्यक्त बापदादांचे अवतरण होत असताना त्यांना दोन लाईटचा साक्षात्कार झाला. एक लाईट अत्यंत प्रकाशमय अर्थात् शिवबाबा आणि दुसरी त्याहून थोडी कमी प्रकाशमय म्हणजे ब्रह्माबाबा, दोन्ही गुलजार दादींच्या तनात अवतरित झाले. 'बच्ची तू खूप सेवा करशील. सेवेसाठी बाबांनीच तुला आफ्रिकेत पाठवलं आहे'. शिवबाबांचं वरदान मिळालं आणि जन्म सफल झाला.

या लेखांत वेदांती दीदींचा उल्लेख आलाय त्यांचा एक अनुभवही अत्यंत प्रेरणादायी आहे तो असा.

१९७४ साली आफ्रिकेतील प्रथम सेवाकेंद्र उघडल्यापासून आजपावेतो सिस्टर एलिजाबेथसारख्या अनेकांना ईश्वरी सुख-शांतीचा वारसा मिळवून देण्याकरिता निमित्त बनणाऱ्या वेदांती दीदींचा एक अनुभव. आकारमानाने जगातील दुसऱ्या क्रमांकाचा खंड असलेल्या आफ्रिकेत ५४ देश आहेत. त्यातील एका देशात दीदी सेवेसाठी गेल्या होत्या. रेडियोवर मुलाखत होती. त्या देशात मागील सहा वर्षांपासून पाऊस पडला नव्हता. सर्व धर्मांच्या प्रार्थनास्थळांमध्ये प्रार्थना सुरू होत्या. हरतऱ्हेचे प्रयत्न करूनही पाऊस पडत नव्हता. रेडिओवरील मुलाखतकाराने दीदींना हळूच विचारले, 'तुमचा राजयोग पाऊस पाडून दाखवू शकतो का?' त्या गप्प राहिल्या तसं त्याने पुन्हा विचारलं 'तुम्ही संकल्पाद्वारे पाऊस आणू शकता का?' दीदी 'हो' म्हणाल्या. दोन दिवस विशेष योग करून रात्री १ वाजता झोपी जाण्यापूर्वी बाबांना म्हणाल्या, 'मीठे बाबा पाऊस पडला नाही तर तुमचं नाव खराब होईल' दोनच तास झाले असतील. पहाटे तीनच्या सुमारास शेजारच्या घरातील स्त्रीने दार वाजवलं, स्वतःची ओळख सांगून बाहेर पाऊस पडत असल्यची सुवार्ता दिली. खरंच त्या दिवशी पहाटे तीन ते आठ वाजेपर्यंत ५ तास पाऊस पडला. रेडिओ, टेलिव्हिजन सगळीकडे एकच बातमी प्रसारित होत होती. 'राजयोगाद्वारे पाऊस' पडल्याची. त्या दिवशी सेवाकेंद्राचा दूरध्वनी सतत खणखणत होता. शिवबाबांची कमाल बघून दीदींचे डोळे प्रेमाश्रूंनी भरले. याचं फलित म्हणून कित्येकांनी राजयोगाचा कोर्स केला. किती मोठी ईश्वरी सेवा घडली.

महाशिवरात्रीच्या पावन पर्वात आपणही सेवेचा निश्चय करूया. अनेकांना एक 'शिव' परमात्म्याचा संदेश देऊन २१ जन्मांसाठी संपूर्ण पवित्रतेचा, सुखा-समाधानाचा वारसा मिळवून देऊया. ओम् शांती.

***

विश्वाचे भाग्य विधाता

ही असे अलौकिक तुमची, परिवर्तनशाली गाथा।
ठरलात पिताश्री तुम्ही, विश्वाचे भाग्यविधाता।।धृ।।
अनुसरले ब्रह्माबाबा, हे जीवन तुमचे ज्यांनी।
जाहले तेच श्रेष्ठात्में, परिवर्तन अपुले करूनी।
प्रत्यक्ष तयांच्या पुढती, आदर्श आपुला होता।
ठरलात पिताश्री तुम्ही विश्वाचे भाग्यविधाता।।१।।
तव मुखातुनी हे बाबा, जी स्रवली अमृतवाणी।
कल्याण जगाचे केले, त्या दिव्य शब्द रत्नांनी।
ते बोल शिवाचे होते, अनुभवास आले आता।
ठरलात पिताश्री तुम्ही, विश्वाचे भाग्य विधाता।।२।।
होऊन विदेही बाबा, विश्वाची सेवा करिती।
संदेश सूक्ष्मसेवेचा, जुण यातून वत्सां देती।
अव्यक्त दिनी ह्या त्यांच्या हे कंकण बांधू हाता।
ठरलात पिताश्री तुम्ही, विश्वाचे भाग्य विधाता।।३।।
ती त्याग, तपस्या तुमची, ते अनुपम निर्मळ जीवन।
पाहून प्रेरणा घेती, अन् स्वतःस करिती पावन।
अन् महारथी ही होती, तव मार्गे जीवन जगता।
ठरलात पिताश्री तुम्ही, विश्वाचे भाग्य विधाता ।।४।।

– एक ब्रह्माकुमार

चिंतन

लंघन : १

ब्र. कु. काश्मिरा, वाडा

अमेरिकन शास्त्रज्ञ व लेखक बेंजामिन फ्रँकलिन सुचवतात, 'लंघनासारखे उत्तम औषध नाही. लंघनाच्या जोडीला पुरेशी विश्रांती घेतल्याने शरीरात अनेक चांगले बदल घडून यायला सुरुवात होते. महात्मा गांधीजींना ज्यांनी जवळून पाहिले, अशांपैकी काहींच्या मते गांधीजींच्या त्वचेला एक वेगळेच तेज होते. कदाचित ते उपवासानेही प्राप्त झाले असावे.

आठवड्यातून किंवा महिन्यातून अथवा जशी आवश्यकता असेल त्याप्रमाणे प्रत्येकाने लंघन करावे असे आयुर्वेद आणि भारतीय तत्त्वज्ञान सांगते. लंघनाला धार्मिकतेची जोड देण्यात आली आणि चातुर्मास, एकादशी, संकष्टीसारखी व्रत-वैकल्ये प्रचलित झाली. धर्मकारणाच्या नावाआड पचनसंस्थेला आराम देणे हा एक सोपा उपाय ठरला. ख्रिश्चन धर्मातही उपवासची पद्धत आहे. त्याला 'लेंट' असे म्हणतात. काहींच्या मते येशूने देखील ४०-५० दिवसांचे तप केले, त्यात उपवासाचा समावेश होता. इस्लामपंथीय 'रोजा' पाळतात हे तर सर्वश्रुत आहेच. जैन पंथातही वेगवेगळ्या प्रकारचे उपवास सुचवले आहेत, जसे एकदिवस जेवण घेणे व एक दिवस उपवास, एकभुक्त राहणे वगैरे वगैरे.

उपवासातून शरीराला (पचनसंस्थेला) विश्रांती मिळते, जुनाट आजार काढून टाकण्याकरिता काम करण्यास शरीराला वाव मिळतो, अतिरिक्त मेद घटविण्यास हातभार लागतो असे अनेक परिणाम वाग्भट्टांनी नोंदविले आहेत. यास समांतर असा अनुभव मार्क ट्वेनने सांगितला आहे. तो म्हणतो, 'गेल्या पंधरा वर्षात सर्दी-पडसं, किरकोळ ताप अशा किरकोळ कुरबुरीत मी कडक उपवास करून संपूर्ण यशस्वी झालोय. जॅक गोल्ड स्टाईन नावाच्या अमेरिकन फिजीशियनने तर विलक्षण अनुभव कथन केलाय. तो म्हणतो, ''मी स्वतः 'अल्सरेटिव्ह कोलायटीस' म्हणजे आतड्यांचा दाह या आजारावर वर्षातून ३०-४० दिवसांचा उपवास, असे तीन वर्षे केल्याने बरा झालो.'' शोधू पाहता असे अनेक दाखले मिळतील.

अनेक प्रकारचे प्राणीदेखील लंघन करताना आपण पाहतो, कुत्रा, मांजर, घोडा इत्यादी. विशेषकरून सस्तन प्राण्यांत ही स्वयंउपचाराची पद्धती दिसून येते.

याबाबत एका बेल्जियन् शास्त्रज्ञाने बरेच संशोधन केले. त्याचे नाव 'ख्रिश्चन डी दुवे' त्याने १९६० च्या दशकांत एक शब्द प्रचलित केला, Autophagy-Auto म्हणजे स्वतः किंवा स्वतःचे आणि Phagy म्हणजे भक्षण. मानवी शरीरातील पेशीत 'लायसोसोम' नावाचा घटक असतो त्याच्याद्वारे स्वयंभक्षण घडते म्हणजेच सोप्या भाषेत शरीरातील कचरा नष्ट केला जातो. Autophagy या विषयावर 'योशिनोरी ओहसुमी' नावाच्या जपानी बायोलॉजिस्टनेही काम केले. या दोन्ही शास्त्रज्ञांना आपापल्या काळात 'नोबेल' पारितोषिकही मिळाल्याचे आढळते. थोडक्यात काय तर उपवास महत्त्वाचा. **मात्र अध्यात्माचा या सगळ्याशी काय संबंध?**

दिवसातून अनेकवेळा आपले मन-बुद्धी अन्नपदार्थांकडे कळत-नकळत ओढले जातात. उपवासाने शरीरशुद्धीसोबत मनशुद्धीस मदत मिळते. साधनेने जमा केलेली शक्ती, रसनेंद्रियाच्या उपभोगात नष्ट होते; पण

(पान क्र. १४ वर)

कोविड काळातील माझा अनुभव

ब्र. कु. डॉ. ज्योत्स्ना, ठाणे (प.)

डॉ. ज्योत्स्ना बारहाते आयुर्वेदिक डॉक्टर आहेत. गेली अनेक वर्षे नियमित ईश्वरी ज्ञान श्रवण व राजयोगाची साधना त्या करीत आहेत. टाळेबंदी अर्थात् लॉकडाऊनच्या काळात त्यांना स्वतःला आलेला अनुभव देत आहोत.

शिवबाबांची आठवण मला शक्ती देते, हिंमत देते, जगण्याला उभारी देते. जिथे मानवाची सोबत मिळू शकत नाही, तेथे बाबा सदा सोबत असतात हा विश्वासच आपल्याला समस्या मुक्त करतो. असाच एक करोना काळातील अनुभव मी सांगत आहे.

मे २०२० कोरोनाचे साम्राज्य सगळीकडे पसरलेले होते. संपूर्ण लॉकडाऊन, डॉक्टरसुद्धा हॉस्पिटल बंद करून बसले होते. अशावेळी एका रात्री अचानक माझ्या पोटात दुखू लागले. मला समजले नक्कीच 'मूतखडा' आहे. कारण एक वर्षापूर्वीच साधारण १५ मिमीचा स्टोन असल्याने शस्त्रक्रिया केली होती. तो त्रास इतका भयंकर होता की पुनरावृत्ती न व्हावी अशी प्रबळ इच्छा होती. पण परत तेच! वेदना असह्य होत्या, तापही होता. तात्पुरत्या गोळ्या घेतल्या. थोडा आराम मिळाला. लॉकडाऊनमुळे माझे पती गावाकडे अडकले होते. मी व माझा मुलगा फक्त घरात. सकाळी अमृतवेळेला बाबांची आठवण केली. मनातले भाव बोलले बाबांशी. संकल्प केला 'बाबा मी हॉस्पिटलला जाणार नाही. शस्त्रक्रिया तर अजिबात करणार नाही.' पण बाबांचे वाक्य आठवले, 'बच्चे शरीर की बिमारी के लिए शरीर के डॉक्टर के पास जाना ही है, मै आत्मा का डॉक्टर हूँ।

दुसऱ्या दिवशी सर्जनला फोन केला. ते म्हणाले, 'कोविडची चाचणी केल्याशिवाय कोणीही तपासणार नाही., त्यांचे हॉस्पिटलही बंद होते. शेवटी सिव्हिल हॉस्पिटलला जाऊन डॉक्टरांना सांगितले की माझी कोविडची चाचणी करायची. ते म्हणाले लघवीच्या मार्गाचा दाह आणि मूतखड्याची शक्यता असल्याने ४-५ दिवसांनी ताप कमी झाला की करू. परंतु त्या चाचणीशिवाय दुसऱ्या कुठल्याही चाचण्या होत नव्हत्या. शेवटी बाहेरून कोविडची चाचणी केली व ओळखीच्या ठिकाणी एक्सरे केला. त्यात समजले १० मिमी चा मूतखडा आहे. मी लगेच आयुर्वेदिक औषधे चालू केली. मक्याच्या कणसातील केसांचा काढा घेतला, पानफुटीची पाने खाल्ली, गोक्षुर, पुनर्नवा, वरुण, धमासा, पाषाणभेद याचा काढा सकाळ संध्याकाळ घेतला. त्याचबरोबर राजयोगाचा जमेल तितका अभ्यास करत होते. बाबांना मी सांगत होते, 'तूच सुप्रिम सर्जन आहेस, मी शस्त्रक्रिया करुन घेणार नाही'. फोनवरून सर्वजण हिंमत देत होते. खरंतर सर्वजण दूर होते. फक्त बाबाच माझ्याजवळ सर्वार्थाने होते. हर घडी हर श्वास बाबांच्या सहवासाचा अनुभव करत होते.

माझ्या आजाराचे निमित्त झाले. माझे रिपोर्ट दाखवल्याने माझे पती नामदेवभाई यांना जळगावहून घरी ठाण्याला यायची जिल्हाधिकाऱ्यांनी परवानगी दिली; ते म्हणाले, ''येथून तुम्ही जाल; पण तेथे रस्त्यात कोणी अडवले तर तुम्हाला क्वारंटाईन व्हावे लागेल.'' पण कुठलाही अडथळा न येता सहीसलामत ते घरी पोहोचले ही एक कमालच होती.

मी कोविडबाधित नाही असे चाचणीत आढळून आले. दुसऱ्या दिवशी एका सर्जनची मोठ्या मुश्किलीने भेट मिळाली

होती. पण त्याच रात्री चक्क माझा मूतखडा पडला. मला खूप आनंद झाला. मी शिवबाबांना 'धन्यवाद' म्हटलं बाबांची आठवण, त्यांची शक्ती, विश्वास व दृढसंकल्प या सर्वांचा एकत्रित परिणाम औषधांना पण बळ मिळाले व खडा पडला.

दुसऱ्या दिवशी सर्जनला सर्व सांगितले. ते माऊंट आबूला जाऊन आले आहेत. त्यामुळे त्यांना ब्रह्माकुमारी संस्थेबद्दल सर्व माहीत आहे. ते मला एवढच म्हणाले, ''खरं तर ते शक्य नाही; पण असे घडले; हे तपस्येचे फळ आहे. ही त्या परमात्म्याचीच किमया आहे.' त्यांनी औषधे दिली व पुन्हा होऊ नये म्हणून काळजी घेण्यास सांगितले. का घडलं, कसं घडलं? यापेक्षा सर्वशक्तिमान बाबांची मदत, स्नेह माझ्यासाठी फार महत्त्वपूर्ण होता. कारण डॉक्टर असून जर माझी अशी अवस्था होती तर सर्वसामान्य माणसांची काय? शिवबाबांचे शब्द आठवतात, ''अशी वेळ येईल की घराबाहेर पडू शकणार नाही डॉक्टर देखील मिळणार नाही.' मी हे प्रत्यक्ष अनुभवत होते. पण मी भाग्यवान आत्मा आहे. स्वतः परमपिता परमात्मा माझा पिता बाबा आहे. तो सदा माझ्यासोबत आहे, त्याची शक्ती मदतीला आहे. हीच शक्ती कितीही अडथळे आले तरी माझी जीवनरूपी नौका सहज पार करायला मदत करेल. हा ठाम विश्वास आहे. खरंच बाबा – एक तेरा साथ मुझको दो जहाँ से प्यारा है। तू है तो हर सहारा है।

***

(पान क्र. ६ वरून)

सेवा करून रात्री पहारा देण्याची सेवा करत. अविरतपणे दादांनी सेवा केली व सर्व सेवा करत असताना ईश्वरी दिनचर्येत कधीही फरक पडू दिला नाही. एकदा भांडी घासणारा नोकर आजारी पडला. तेव्हा बाबांनी त्यांना भांडी स्वच्छ करायचे कार्य दिले. तेव्हा दादांना इतका आनंद झाला. ह्या व्यक्तीला कुठलेही कार्य दिले तरी तो पूर्णपणे ते पार पाडेल ही खात्री दादांच्या वर्तनामुळे बाबांच्या मनात तयार झाली होती. आम्ही देखील त्यांना स्वतःची थाळी स्वतःच धुताना पाहिलंय. भांडे असे आरशासारखे लख्ख चमकवत की कोणी स्वतःचा चेहरा देखील बघू शकेल!

नंतरच्या काळात दीदीमनमोहिनींनी दादांना दिल्ली, कमलानगर येथे पाठविले तिथे मार्केटिंग, कोर्स करविणे इ. सेवा दादांनी केल्या. दादांचे चारित्र्य निर्दोष हिऱ्याप्रमाणे होते. दादांवर कार्य सोपवून बाबा निश्चिंत होऊन मुंबई, दिल्ली सेवाकेंद्रावर जात व म्हणत, 'विश्वरतन यज्ञरक्षक बनून तिथे बसलेला आहे, त्यामुळे मला चिंता नाही'. सभ्यता, शालीनता व साधेपणा ह्या गुणांनी सजलेल्या दादांचे जीवन हे अध्यात्माचे खुले पुस्तकच होतं. त्यांना पाहून साकार ब्रह्माबाबांचाच भास होत असे. शारीरिक व्याधी असतानाही मुरलीची वेळ चुकवली नाही. अक्षर तर जणू मोत्याचे दाणे होते. ते संस्थेच्या मॅनेजमेंट कमिटीचे सदस्य होते. शेवटची बरीचशी वर्षे ते अकाऊंटस विभागात कार्यरत होते. अकाऊंट विभागाचे मनोजभाई आपल्या अनुभवात सांगतात 'दादांचं बापदादा व ब्राह्मण परिवारावर जिगरी प्रेम होतं.' शेवटची काही वर्षे त्यांनी यज्ञातून स्वतःसाठी नवीन कपड्याची जोडीही घेतली नाही. बाबांनी त्यांना सदऱ्याचे एक बटन बनवून दिले होते. शेवटपर्यंत त्यांनी तेच बटन वापरले.

ते म्हणत 'ज्याच्यामुळे इतरांचे व्यर्थ विचार चालतील असे चुकीचे वर्तन जरादेखील आपल्या हातून होऊ नये.' उदा. पत्रावर लिहिलेला पत्ता जर पोस्टमन वाचू शकला नाही तर त्याचाही संकल्प चालेल की कोण हा? काय लिहिलंय धड वाचतासुद्धा येत नाही व ह्या कृतीनेसुद्धा आपल्या कर्माचा हिशोब तयार होईल म्हणून अक्षर सुबक असलं पाहिजे. त्यांनी पुरुषार्थासाठी एक साधंसोपं वाक्य सांगितलं सदैव असं समजा **बाबा माझ्यावर लक्ष ठेवून आहेत म्हणजे तुमच्याकडून चूक होणार नाही.** देहत्यागाच्या आधीच्या रात्री आम्हा सर्व सेवासाथींना बोलवून दादांनी प्रेमाने दृष्टी दिली. मलाही आईप्रमाणे जवळ धेतलं दुसऱ्या दिवशी म्हणाले, 'काही सेवा असेल तर सांगा काहीही काम बाकी राहता कामा नये.' नंतर मुरली वाचली व वरती पांडवभवनला जायचंय हा धोशा लावला. गोकुळभाईबरोबर पांडवभवनमध्ये ब्रह्माभोजन स्वीकार केले व दि. २६ फेब्रुवारी २००७ रोजी देहरूपी पिंजऱ्यातून मुक्त होऊन दादांनी सूक्ष्मवतनाकडे झेप घेतली.

***

माझी पहिली मधुबन यात्रा

ब्र. कु. जयलक्ष्मी, ठाणे (प.)

जाता जाता वर्षेही पुढे चालली
अनेकांची स्मृतीही मागे पडली
कारण... सारखा काळ चालला पुढे
सृष्टीचे हे रहाट गाडगे... फिरताना
विसरूनी गेलो आमची नाती
कारण... सारखा काळ चालला पुढे
कुणा वाटते ही करुण कहाणी
कुणी समजते हे तर नयनातील पाणी
कारण... सारखा काळ चालला पुढे

एखादे चित्र डोळ्यांनी पाहताना नेत्रपटलावर त्याची प्रतिमा उमटते आणि काळाच्या ओघात आपण ते विसरूनही जातो. मात्र जी अनुभूती अंतःकरणात प्रवेश करते तिची अद्‌भुत, सुंदर अशी लेणीच तयार होतात. मी व माझे जीवन साथीदार श्रीधरभाई दोघांनी ईश्वरी ज्ञानमार्गावर नुकतीच मार्गक्रमणा सुरू केली होती आणि आम्हाला इंजिनियरींग कॉन्फरन्सच्या (अभियांत्रिकी परिषदेच्या) निमित्ताने ज्ञानसरोवर, माऊंट आबूला जाण्याचा योग जुळून आला.

मधुबन स्वर्गाश्रमी जाण्याचा भाग्ययोग जुळून आल्यामुळे मी आनंदात होते. स्वतःच्या भाग्याचा स्वतःलाच हेवा वाटावा अशी मनाची स्थिती होती. ज्ञानमुरलीत बाबा म्हणतात, 'तुम्ही माझी मुले पद्मापद्म भाग्यशाली आहात', याचा अनुभव करण्यासाठीच जणू ही यात्रा सुनिश्चित झाली. परिषदेविषयी माहिती मिळून तिथे जाण्यासाठीची सगळी औपचारिकता पूर्ण करेपर्यंत रेलवेची तिकीटे बुक झाली होती. या कारणामुळे आम्ही उदयपूरपर्यंत विमानाने पोहोचलो तेव्हा दुपारचे २.३० वाजले होते. मधुबन, पाण्डवभवन किंवा ज्ञानसरोवरला जायला एकही खासगी बस त्यावेळी उपलब्ध नव्हती. आमच्या सोबत संस्थेचा माहीतगार म्हणून कुणीही सोबती नव्हता. बाकीची मंडळी रेलवेने येणार होती. ती दुसऱ्या दिवशी पोहोचणार होती. आम्ही राज्य परिवहनाच्या बसमध्ये बसलो.

साधारण ३च्या सुमारास त्या खटारा बसने प्रवास सुरू झाला आणि तासाभरातच कानठळ्या बसविणारा आवाज झाला. पण काय आश्चर्य बस काही थांबली नाही. आम्ही दोघे वगळता बाकीचे प्रवासी काहीच झाले नाही अशा थाटात डुलत होते. कदाचित त्यांच्यासाठी हे नित्याचेच असावे. आम्हाला राहवले नाही म्हणून ड्रायव्हर-कंडक्टरला विचारले तेव्हा त्यांनी बस थांबवली आणि खाली उतरून पाहतो तर फक्त टायरच फुटले नव्हते तर चाकाचा लोखंडी गाडाही वेडावाकडा झाला होता. म्हणजे अजून काही अंतर अशाच अवस्थेत बस नेली असती तर न जाणो अनेकांचा कपाळमोक्षच झाला असता.

इतर प्रवासी मंडळीही खाली उतरून कुतूहलाने बघू लागली. कुणी तो वेडावाकडा गाडा ठीक करण्याचा प्रयत्न करू लागले तर कुणी काय! या भानगडीत साधारण संध्याकाळचे ५ वाजले असावेत. मागून येणाऱ्या बसेसही खचाखच भरल्यामुळे जराही वेग कमी न करता तशाच पुढे गेल्या. मी खाली न उतरता आपल्या जागेवरच बसून होते. मनात भीतीचा लवलेशही नव्हता, एक प्रकारची निश्चिंत स्थिती आपसूकच होती. स्वाभाविकपणे मी बाबांशी मनातले हितगुज सुरू केले आणि अचानकपणे बसच्या पुढच्या काचेवर निळा रंग पसरू लागला. बाबांची हात पसरून उभी असलेली मूर्ती माझ्या डोळ्यासमोर साकार होऊ

लागली. माझा माझ्यावरच विश्वास बसेना. जणू काही त्या मूर्तीतून मला सूचक शब्द ऐकू आले, ''मुली तू घाबरू नकोस, चिंतेचे कारण नाही. पुढच्या बसने तुम्ही मधुबनला पोहोचाल, ही बस इथेच सोडा, याची व्यर्थ आशा बाळगू नका.'

काळोख दाटायला सुरूवात झाली होती. त्या जागी फार काळ थांबणे धोक्याचे होते. श्रीधरभाई बसमध्ये येऊन बसले आणि मी त्यांना घडला प्रकार सांगितला. बाबा जणूकाही आपल्यासोबत आहेत आणि आपल्याला असे वाऱ्यावर सोडणार नाहीत हे मनांत ठाम होते. मागून एक बस आली आणि त्यात आम्हाला जागा मिळाली. एक तरुण मुलगा आमच्या सीटजवळ आला आणि म्हणाला, ''काही काळजी करू नका मीही माऊंट आबूलाच जात आहे. मी तुम्हाला मदत करेन. मी तुम्हाला ज्ञानसरोवरला सोडून मगच पुढे जाईन.'' नंतर आम्हाला समजले, ती बस वाटेतल्या कुठल्याशा गावात जाणारी होती, ज्ञानसरोवरपर्यंत जाणार नव्हतीच. पण तो तरुण मुलगा आमच्या सोबत होता. वाटेत एका ठिकाणी आम्ही बसमधून उतरून टाटा सुमो जीपगाडीत त्याच्या बरोबर बसलो. ती जीपही गच्च भरलेली होती. राजस्थानी भाषेत त्या लोकांची जोरजोरात बडबड चालली होती. त्या तरुणाने जीपचालकाशी काहीतरी बोलणे केले आणि अचानक गाडीचा वेग वाढला. आम्ही काळजीने विचारले तेव्हा तो म्हणाला, ''घाबरू नका. शेवटची एक बस वाटेतच पुढे आहे, तिला गाठायचा आपण प्रयत्न करूया.'' देव तारी त्याला कोण मारी? साधारण ११-११.१५ च्या सुमारास बस गाठण्यात आम्हाला यश आले. त्या बसमध्ये तीन ब्र.कु. भाऊ होते. ते पांडवभवनातच जाणार होते. त्यांनी आश्वासन दिले, आम्ही तुमची ज्ञानसरोवरला जाण्याची व्यवस्था करू काही काळजी करू नका.

किर्र अंधाराच्या सागरातून जणू एक बस धावत होती. हृदयी विश्वास होता. बाबाच आपल्याला घेऊन जात आहेत. भीतीचा अंशमात्र स्पर्शही न होता आम्ही प्रवास करीत होतो. **मजल दरमजल करीत आम्ही बाराच्या सुमारास ज्ञानसरोवरला पोहोचलो आणि मला बाबांचे ते हात पसरून स्वागत करणारे चित्र दिसले. हेच चित्र माझ्या अंतःचक्षूंनी काही तासांपूर्वी काचेवर पाहिले होते. आता ते चर्मचक्षूंसमोर होते. यापूर्वी मी बाबांचा असा फोटो कधीही पाहिला नव्हता. अंतर्मनातून एकच आवाज उमटला-प्रेमळ बाबा.**

ज्ञानसरोवरला पोहोचल्यावर आमची राहण्या-खाण्याची उत्तम व्यवस्था झाली. अदृश्य अशा प्रेमरज्जूने आम्हाला सुरक्षितपणे बाबांच्या घरात आणून सोडले होते. भक्तिमार्गात जनाबाईंच्या अभंगात वाचले होते, ते प्रत्यक्ष अनुभवायलाच मिळाले.

'धरिला पंढरीचा चोर, प्रेम बांधोनिया दोर'

***

(पान क्र. १० वरून)

उपवासाद्वारे शक्तीचा ऱ्हास रोखता येतो. खाण्या-पिण्याबद्दलचे आकर्षण म्हणजे त्याबाबतचा लोभ. आणि लोभ जिंकणे म्हणजेच तपाचरणातील एक भाग नव्हे का?

'ज्याने रसना जिंकली त्याने जग जिंकलं' असं म्हणतात. रसना जिंकण्यासाठी लंघन एक माध्यम आहे म्हणून म्हणतात 'लंघनम् परम औषधम्!' हे शरीर आणि मन दोन्हीस लागू पडते.

आज अन्नासंबंधी लंघनाबाबत चिंतन मांडले आहे, अध्यात्मात अजून काही वेगळ्या लंघनांचा समावेश केला जातो त्याविषयी पुढील भागांतून जाणून घेऊया.

***

सुविचार

केवळ भित्री आणि दुर्बळ व्यक्तीच दैवावर हवाला ठेऊन जगते; पण कणखर आणि आत्मविश्वास बाळगणारी व्यक्ती दैवावर विसंबून न राहता सदैव प्रयत्नशील राहते. तीच यशाची गुरुकिली आहे.



''व्हावे लहानाहुनि लहान''

ब्र. कु. ज्ञानेश्वर, पुणे

''देव पहाया गेलो आणि देवचि होऊन गेलो'' अशी सुंदर आत्मअनुभूती होणारे संत कुठे? आणि आपण गृहस्थाश्रमी माणसं कुठे? असा विचार बऱ्याचदा काही लोकांच्या बोलण्यातून जाणवतो. पण ह्यातल्या कितीतरी थोर संतांनीही प्रपंचाचा अनुभव घेतलाच की! तुकाराम महाराज हे तर त्यातले आदर्श उदाहरण मग आपली अवस्था इतकी उच्च होऊ शकते का? या प्रश्नाचं उत्तर होकारार्थी द्यायला हवं. फक्त मन आणि बुद्धीला एकाग्र करण्याची व्यवस्था केली तर अशी सुंदर अवस्था जरूर अनुभवता येईल.

आता त्यासाठी देवाचं खरं स्वरूप समजलं पाहिजे आणि आपलंही स्वरूप समजून घेतलं पाहिजे. मी आणि देव, आत्मा व परमात्मा यांच्यातील अंतर मिटवायचं असेल तर प्रथम 'मी कोण?' भगवंत कोण? त्याच्याशी माझं नातं कोणतं हे समजून घ्यायला हवे भगवंताचं वर्णन करताना आपण म्हणतो- अनंत-ज्याला अंत नाही असा! पण आपण मात्र त्याच्या अंतापर्यंत जाण्याचा प्रयत्नच करत नाही जरा कुठे मनासारखं घडलं नाही की म्हणतो अरे! भगवंता किती अंत पाहणार आहेस? तो अव्यय आहे अर्थात् त्याच्याकडे कोणत्याही गोष्टीचा व्यय नाही (खर्च नाही). आपलं वर्णन करायचं झालं तर 'सतत व्यय' असेच आहे. आपण नकारात्मक विचार करून आपली कितीतरी शक्ती रोजच्या रोज खर्च करत असतो.

आज हा विचार अनेकांना पटला आहे म्हणूनच अनेकजण सत्संगाकडे आकर्षित झालेत. सत्याचा संग म्हणजेच सत्संग. परमपिता परमात्मा एकच सत्य आहे, शाश्वत आहे म्हणून त्याची आठवण करणे. हाच खरा सत्संग आहे. परमात्मा अपरिवर्तनीय आहे. या जगातील प्रत्येक गोष्ट, वस्तू मात्र परिवर्तनशील आहे. कारण प्रत्येकाला उत्पत्ती-स्थिती व लय या ३ अवस्थांतून जावेच लागते. परमात्मा त्याच्या पलीकडे आहे म्हणूनच तो एकच शाश्वत आहे. मग आपण शाश्वत सत्य सोडून अशाश्वताच्या मागे का धावायचे? या परमात्मज्ञानाचा बोध झालेल्या संतश्रेष्ठांनी म्हणूनच नाही का संसारातील क्षणिक सुखांना 'मृगजळाची' उपमा दिली !

अशा या परमश्रेष्ठ परमात्म्याचा परिचय आपल्याला झाला तरच त्याला आठवणेही 'सहज' होईल नाही कां? परिचयाशिवाय एखाद्याला आठवता येईल का? आता हेच पहा ना! आपण रस्त्याने जाताना शेकडो माणसे आपल्याला दिसतात; पण त्यातच जर एखादा परिचित असला, तरच आपण वेळात वेळ काढून थांबतो, त्याच्याशी बोलतो.

परमात्म्याचा थोडक्यात परिचय म्हणजे जो सुखकर्ता, दुःखहर्ता आहे, ज्योतिर्बिंदू-प्रकाशस्वरूप आहे - दिव्य गुणांचा अखंड स्त्रोत आहे-सुखाचा सागर आहे-जशी सागरात लाखो रत्ने दडलेली असतात, अपार खजिना असतो तसे परमात्म स्मृतीत रंगले असता लाखो ज्ञानरूपी रत्ने आपल्याला प्राप्त होतात. त्याच्या शक्ती, गुण यांची तो आपल्यावर मुक्तपणे उधळण करतो, कारण त्याला हवी आहे फक्त आपली शुद्ध सात्विक भावना. म्हणून तर म्हणतात ना- 'देव भावाचा भुकेला!'

दृढ विश्वास - शुद्ध हेतु आणि अढळ श्रद्धा या

(पान क्र. २५ वर)

ईश्वरी सेवेद्वारे कर्मबंधनातून सुटका

ब्र. कु. अभिजीत, ठाणे (प.)

कुणाशी तरी बोलता बोलता अचानकच माझ्या आयुष्यातली मागील पानं उलटली गेली आणि मी वर्ष २०१२ मधे जाऊन पोहोचलो..!

सप्टेंबर २०१२ ते जानेवारी २०१३ असं साधारण तीन-साडेतीन महिने ठाणे कारागृहात जाऊन तेथील बंदी बांधवांसाठी ज्ञानमुरली वाचून दाखवण्याचा योग आला. तसं पाहता १९९८ पासून ठाणे कारागृहामधे प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयातर्फे ७ दिवसांचा कोर्स व नंतर ज्ञानमुरली वाचन करविणे असा उपक्रम चालू झाला. संस्थेतर्फे रोज मयूरभाई व अनंतभाई जाऊन मुरली वाचायचे. मात्र मी त्यापूर्वी कधी सहभागी होऊ शकलो नव्हतो.

एक दिवस लतिकादीदींनी मला 'जेल'मधे ज्ञानमुरली क्लास करण्यास सांगितले व तिथून पुढे सलग तीन-साडेतीन महिने मी व मयुरभाई जात होतो.

ज्या ठिकाणी स्वा. सावरकरांना अंदमानला नेण्याआधी काही काळ जिथे ठेवलं होतं तेच हे ठाणे कारागृह. इंग्रजांनी ठाण्यातील किल्ल्याला कारागृह बनविले. जेल आतून पाहण्याची माझी पहिलीच वेळ होती. जेलचं प्रवेशद्वार उंच व भरभक्कम आहे. आतमधे शिरल्यावर व्यक्तींची कसून तपासणी केली जाते. खिशामधून कुठलीही वस्तू, मोबाइल नेण्यास परवानगी नसते. तिथून आत गेल्यावर काही पडक्या खोल्या व बंदीवान पळून जाऊ नये म्हणून आतून व बाहेरून गुळगुळीत केलेल्या उंचच उंच भिंती दिसतात.

मी जिथे मुरली वाचनाकरता जायचो ती जागा म्हणजे तीन बंदींसाठी असलेली फक्त दहा बाय दहाची छोटीशी खोली होती व त्यातच दार नसलेलं असं कापडी पडदा लावून झाकलेलं शौचकूप होतं. दार नसण्याचं कारण म्हणजे दोन कैद्यांचं भांडण झालं तर एकाने दुसऱ्याला आत कोंडून ठेवू नये व तीन कैदी एका खोलीत ठेवण्याचं कारण म्हणजे दोघांनी दंगा केला तर तिसऱ्याला आरडाओरडा करुन अधिकाऱ्याचं लक्ष वेधून घेता आलं पाहिजे. तिथे त्यांची 'ॲल्युमिनिअमची भांडी' बघून इंग्रजांनी त्या काळात वापरलेली स्लो पॉयझनिंगची युक्ती माझ्या डोळ्यासमोर आली..!

महत्त्वाची गोष्ट म्हणजे तेथील अन्नामधे हिंगाचा वापर जास्त प्रमाणात केला जातो. अतिरिक्त हिंगामुळे व्यक्ती दिवसभर निरुत्साही राहते व त्याची बंड करण्याची उमेद गळून पडते. एकंदरीत हे सर्व वातावरण म्हणजे नरकापेक्षा भयंकर होतं !

सुरूवातीला मी एक-दोन बंदी बांधवांचा साप्ताहिक पाठ्यक्रम (कोर्स) केला व नंतर त्यांना ज्ञानमुरली वाचून दाखवत असे. हळूहळू काही दिवसांनी आजूबाजूच्या खोलीतील बांधव ज्ञान ऐकण्यासाठी येऊ लागले. मी जिथे जायचो तो विभाग 'काळा पाण्याची' शिक्षा भोगणारे व धोकादायक गणले जाणारे बंदी बांधव ठेवण्याकरिताचा विभाग होता. रविवार व बुधवार सोडून रोजच सकाळी ८ ते ९ मधे आमचा मुरली व योग क्लास चालायचा. त्यांनी आमच्यासाठी बसायला पाच-सहा घोंगड्यांचं (व्याघ्रजिन असल्यासारखं) उंच आसन तयार केलं होतं. मी येईपर्यंत ते सर्वजण अगरबत्ती लावून ध्यानस्थ बसलेले असायचे. ह्या रोजच्या योग व ज्ञान चर्चेमुळे त्या दहा बाय दहाच्या खोलीला ध्यानकक्षाचं रूप आलं होतं. वातावरणात फरक पडल्याने हळूहळू

संख्यादेखील वाढत गेली व खोलीतून बाहेरच्या व्हरांड्यात मुरली क्लास होऊ लागला. रोज ते सर्व बांधव आमची अगदी चातकासारखी वाट बघायचे. स्वतःचा परिचय करून देताना स्वतःच्या शिक्षणासकट ते गुन्हा घडेपर्यंतची सर्व कहाणी थोडक्यात सांगत असत. त्यातले काही तर सुशिक्षित/ पदवीधरही होते.

आम्ही संतापाच्या भरात हे कृत्य केलं आणि आता पश्चाताप होतोय' असं बरेचसे बंदी कबूल करायचे. एकाने तर क्रिकेट मॅच खेळताना ठरलेल्या पैजेच्या रक्कमेवरुन मतभेद झाले म्हणून खेळाडूच्या डोक्यात 'बॅट'च हाणली. तो खेळाडू तात्काळ मृत्यू पावला; पण बॅट मारणाऱ्यासकट अख्ख्या 'टीम'लाच १४ वर्षाची 'काळा पाण्याची' शिक्षा झाली. गुन्हा एकाने केला तरी टीमच्या उरलेल्या लोकांना शिक्षा का झाली? असा प्रश्न त्यातील एकाने विचारला, मी म्हटलं ही पण एक कर्मगती आहे, नियतीची योजना असावी. ह्या जेलच्या बाहेरच्या विश्वात आम्ही वेगवेगळ्या माध्यमातून हे ईश्वरी ज्ञान देण्याचा प्रयत्न करतो; पण त्यातले काही भाग्यवंतच सेंटरपर्यंत पोचू शकतात; पण परमेश्वराने तुमच्यासाठी या परिस्थितीतही तुम्हाला ज्ञान प्राप्त व्हावं अशी व्यवस्था केली आहे.. तुम्ही ह्या 'जेल'ला 'जेल' असं न समजता 'ध्यानकक्ष' समजा व 'मिळालेला वेळ हा ध्यानासाठी वापरा' हे उत्तर ऐकून समाधान झाल्याची पावती तर त्यांच्या चेहऱ्यावर लगेच दिसलीच; पण त्या दिवसापासून त्यांच्या साधनेत थोडीफार तीव्रता आली. आदल्या दिवशीच्या मुरलीतले प्रश्न काढून दुसऱ्या दिवशी त्याची उत्तरं विचारत असत. रोज दिवसभरात कितीवेळ बाबांची आठवण केली त्याचा चार्ट ठेवू लागले. त्यांच्या वर्तणुकीतला बदल बघून त्यांच्या शिक्षेत सूट मिळते. पुढे त्यातल्या एका बंदीची शिक्षा कमी केली गेली व जीवन पूर्णपणे पालटल्यामुळे आज तो कारवार येथील एका सेंटरवर 'समर्पित भाई' म्हणून जीवन जगत आहे..!

'जेल'च्या सेवेसाठी फक्त जाने. २०१३ पर्यंतच माझं जाणं झालं. नंतर दीदींनी 'आजपासून तू समतानगर पाठ शाळेत मुरली वाचून दाखवण्यास जा' असं सांगितलं व तेव्हापासून मी नियमितपणे संध्याकाळी ५-७ ह्या वेळात जाऊ लागलो...! ह्या सर्व काळात (२०११पासून-२०१३ पर्यंत) मला पोटाचा काही त्रास होता. थोडं जरी अन्न खाल्लं तरी खाल्ल्यानंतर पोट खूप जड झाल्यासारखं वाटायचं व लगेच शौचाला जावं लागायचं व (ज्ञानामार्गातील नियमाप्रमाणे) इतरत्र न फिरता लगेच स्नान करायचे. ह्यामुळे (डीहायड्रेशन) पोटात कोरड पडायची व थकवा यायचा.

एकदा अमृतवेळेला योग करताना बाबांना मनापासून सांगितलं 'ह्या शारीरिक त्रासातून बाहेर पडण्याचा मार्ग सांगा'. अचानकपणे मला आठवलं अशावेळेस सहजच एखादी मुरली काढून वाचणे हा एक सर्वोत्तम उपाय असतो. त्याप्रमाणे मी मुरली काढून वाचली. त्यात एक वाक्य होतं 'बच्चे,यज्ञ की किसी भी सेवा को कभी 'ना' नही कहना और मेरी सेवा के संबंध में बंध जाओ तो तुम्हारा कर्मबंधन हलका हो जायेगा' तेच माझ्या प्रश्नाचं उत्तर होतं.

पहिल्यांदा लतिकादीदींनी 'क्लास घेशील का विचारलं, तोच हा दिवस होता.' मी हो म्हटलं आणि तिथून शरीराचा कर्मभोग हा ईश्वरी सेवेच्या संबंधामधे हळूहळू परिवर्तित होऊ लागला आणि मी रोगमुक्ततेकडे वाटचाल करू लागलो. मला योग्य तो औषधोपचार मिळाला आणि तो लागू पडू लागला. त्यापूर्वी मी सर्व प्रकारच्या पॅथी, अनेक डॉक्टर असे बरेच प्रयोग करून झाले होते. पण बाबांच्या श्रीमताची गहन ओळख होण्याकरिता हे सगळं घडणं आवश्यक होतं असं आता मागे वळून पाहता मला कायम जाणवत राहतं. मनांत येतं – आपण किती भाग्यावान आहोत, आपल्यासाठी शिक्षक, सर्जन अशा अनेक रूपात परमात्मा शिव मदतीसाठी सदैव उभा आहे.

भक्तीत म्हणतात 'देवाचिये द्वारी उभा क्षणभरी' पण मला तर वाटतं 'सदा देवच उभा आपल्या शेजारी'.

***

मन नावरे नावरे

ब्र.कु. बिंदिया, ठाणे (प.)

वार्षिक पंचांग म्हणजेच कालनिर्णय दिनदर्शिका पाहताना वर्षभराचे सणासुदीचे दिवस पाहिले जातात. नोकरदार वर्ग सुट्यांचे दिवस पाहतो. नवीन योजना आखल्या जातात, विद्यार्थी मित्र-मैत्रिणी परीक्षेअगोदरचे अभ्यासाचे दिवस मोजत असतात. प्रत्येक महिन्याची पाने उलटत असताना सहज आपण जातो त्या भूल घालणाऱ्या भविष्यातल्या स्वप्नांच्या दुनियेत. तिथेच रेंगाळतो, घुटमळतो आणि पुन्हा भानावर येतो वर्तमानात.

रोजची आव्हाने, समस्या, जबाबदाऱ्या दिसू लागतात. त्रागा होतो, कंटाळा येतो. स्वप्न, मनसुबे पोकळ वाटू लागतात. शेवटी काय दुरून डोंगर साजरा, जवळ जाता काजरा म्हणजेच पुन्हा तेच काम, तीच नाती जपता जपता वर्तमानसमयी प्रत्येक गोष्ट कठीण, काटेरी भासते.

पण तरीही...तरीही दिनदर्शिकेमध्ये एक-दोन दिवसाआड शुभ दिवस नक्की घोषित झालेला आहे. ही आहे किमया कालचक्राची. त्यामध्ये चढउतार दोन्ही अटळ आहेत. सणासुदींमुळे उजाळा, झगमगाट आहे. भक्तिभावाबरोबर शक्तीचे पुनरूज्जीवन आहे. असा हा महाशिवरात्रीचा सोहळा.

शिवाची महान रात्र : निराकाराचे पूजन साकाराच्या हस्ते. अजन्माचा अलौकिक जन्मसोहळा. कलियुगी अंधकाराला नष्ट करून ज्ञानाचा दीपोत्सव साजरा करणारा ज्ञानाच्या चैतन्याचा प्रकाश सर्वदूर पसरवणारा महाशिवरात्री हा सोहळा आगळा वेगळा आहे. नावातच मोठेपण आहे. शिवरात्र नावात अंधार आहे व निराकाराच्या प्रकाशाचे तेज आहे. शिव अजर, अमर, सूक्ष्म, चैतन्य ईश्वर आहे. त्याच्या अवतरणाने त्रिभुवनातील अंधार, अमंगळ, अशुभ नष्ट होते. पण नेमके अंधार अमंगळ, अशुभ कसे समजायचे? उदा. एखाद्या महत्त्वाच्या कामाला निघालो आहोत व रस्त्यामध्ये एखादे मांजर आडवे गेले. आपण सगळेजण स्वतःला पुरोगामी समजतो. आपल्याला माहिती आहे, तार्किकदृष्ट्या ही अंधश्रद्धा आहे. असे काही परिणाम होत नाहीत. तरीही आपले मन प्रतिगामी होते व जुनाट विचारांना महत्त्व देते म्हणजे त्याच क्षणी बरोबर निशाणावर अचूक विचारांचा वार झाला पाहिजे. तेव्हाच ते अंधारलेले, अमंगळ, अशुभ नष्ट होईल. त्यासाठी सत्य, सशक्त ज्ञानाचा वर्षाव वेळोवेळी आवश्यक आहे. स्वत:ला सहजपणे सांगता येईल की ठीक आहे तू शांत रहा, गप्प बसू नको; पण शांत रहा. यामध्ये गप्प बसणे व शांत राहणे यात फरक आहे. गप्प बसणे म्हणजे मनाच्या आतमध्ये विचारांचा उद्रेक होत असतानाही शब्दांना प्रयत्नपूर्वक जबरदस्तीने दाबून ठेवणे. शांत राहणे म्हणजे प्रक्षोभक, उत्तेजक विचारांची शक्ती विधायक, शांत, सुलभ विचारांमध्ये परिवर्तित करणे. यामुळे आपण आपले मन बदलू शकतो. मनावर आपण स्वत: संस्कार करतो. एखादी मांजर आडवी गेली तरी माझ्या कामामध्ये कोणताही व्यत्यय येऊ शकत नाही. जर काम बिघडले तर ते माझ्याच चुकीमुळे होऊ शकते. मांजरीसारख्या मूक प्राण्याचा त्यात काही दोष नसतो.

विचार बदलले तर मन बदलते, कृती, दृष्टी, वृत्ती व स्थिती बदलते. बऱ्याचदा असे होते, नकारात्मक विचार चालू असतात. त्वरीत तेव्हाच त्यांना शांत करून दिशा बदलणे शक्य न होता काही काळ निघून गेल्यावर आपण

भानावर येतो की माझी भरपूर शक्ती व वेळ वाया गेला. मग तेव्हाच्या तेव्हा मनाला बदलणे हे आवश्यक असते. यासाठी एकच उपाय वा अभ्यास रोज काही मिनिटे, किंवा काही विशिष्ट दिवशी किंवा दिवसातील काही विशिष्ट वेळी नाही. तर सतत प्रत्येक विचारावर कटाक्ष हवा. दिवस असो, रात्र असो, खात असो किंवा पीत असो, चालत असो. विचारांवर किंवा मनावर लगाम लावणे या सातत्यपूर्ण अभ्यासालाच राजयोगी जीवनशैली म्हटलेले आहे.

शिवपिंडीवर अभिषेकपात्रातून संतत धार महत्त्वाची मानतात. म्हणजे जसा शिव ज्ञानाचा सागर आहे तसेच त्याचे ज्ञान आपल्याही बुद्धीत सतत टपकत राहिले पाहिजे. जर त्या पात्रातील दूध ,जल एकाच दमात ओतले तर काय हरकत आहे? एकदाच मन बदलून टाकू मग आपण मोकळे; पण ही सृष्टी किंवा निसर्ग जसा परिवर्तनशील असतो तसेच मन उधाण वाऱ्याचे आहे. गूज पावसाचे आहे. रानातल्या ढोरासारखे आहे. त्यावर सकारात्मक, सशक्त व सत्य विचारांचा सतत अभिषेकच हवा. ज्यांना राजयोगाविषयी अधिक माहिती करून घ्यायची आहे त्यांनी यंदाच्या महाशिवरात्रीच्या निमित्ताने राजयोगाचे ज्ञान ब्रह्माकुमारीजच्या जवळच्या सेवाकेन्द्रावर जाऊन अवश्य घ्यावे. साक्षात शिवाने स्वतः येऊन दिलेले ज्ञान संस्थेद्वारे दिले जाते. त्याद्वारे आपण आपल्यावर तो अभिषेक करून आपल्या अज्ञानरूपी रात्रीच्या अंधारातून बाहेर येऊन येऊ शकतो व प्रकाशाचा सागर स्पष्ट दिसू लागेल.

या ज्ञानाच्या अभिषेकाबरोबर आपल्याकडे या दिवशी उपवासाची पद्धत आहे. साधारणत: सर्वजण खाण्याचा उपवास करतात. खरे तर उपवास हा मनाचा असतो. जेव्हा आवश्यकता नाही तेव्हा विचारांच्या आधारे मन उपराम म्हणजे जगाच्या व्यापारापासून, चाली–रीती, नाती–गोती यापासून उपराम असावे. दूर असावे. उप म्हणजे निकट, वास म्हणजे वस्तीला असावे. मन ईश स्मृतीत असावे. असा उपवास सर्वांनी जरूर करावा. पण आपण केवळ खाण्याचे प्रकार बदलतो. सध्याच्या काळात तर रोजच्या जेवणापेक्षा खास पदार्थ व विविध पदार्थ उपवासाच्या दिवशी बनवतात किंवा सध्या फॅशन आहे, रेडीमेड घरगुती पदार्थ निरनिराळ्या सेवांमार्फत किंवा हॉटेलातून मागवून खाल्ले जातात. अखेर उपवासाच्या पदार्थामुळे व त्यादिवशी अती खाण्यामुळे पोट बिघडू शकते. अपचन होऊ शकते. उपवास हा आपल्या मनातील (लीकेज) गळती थांबवण्यासाठी आहे. जितका जिव्हेवर ताबा तितके विचारांमध्ये श्रेष्ठत्व व स्थैर्य येते. नकारात्मक विचार म्हणजेच अंधार व या अंधाराचा नाश सकारात्मक विचारांच्या प्रकाशाने होईल तेव्हाच खरी महाशिवरात्री साजरी होईल. अशा प्रकारचा उपवास व अभिषेक हा मानसिक अभ्यास रोज करूया.

स्वत:ला जागृत करूया अज्ञानरूपी निद्रेतून. संपूर्ण शरीराला हल्के करूया, मनाला शांत करूया. निरीक्षण करूया माझ्यामध्ये विचार जे चालू आहेत ते कोणत्या स्वरूपाचे आहेत. कोणत्या विचारांमुळे माझी शक्ती गळून जात आहे? 'पराचा कावळा' करण्याची माझी सवय नाही ना. अति विचार किंवा व्यर्थ विचारांमुळे मी थकत तर नाही ना. जर असे आहे तर मी निर्णय करते– आजपासून मी कोणत्याही परिस्थितीत घटनांना, परिस्थितीला अवास्तव महत्त्व देणार नाही. जेवढी परिस्थिती आहे, तेवढाच विचार मी करेन. हे मी करू शकते. माझे विचार माझ्या नियंत्रणामध्ये आहेत. समजुतदारपणे मी प्रत्येक विचार निर्माण करीन. सकारात्मक होण्याने मला चांगले वाटत आहे. अशा प्रकारच्या विचारांत नित्य काही काळ घालवण्याचा प्रयत्न अवश्य करा आणि अनुभव घ्या. इति शम्.

***

माउंट एव्हरेस्टच्या शिखरावर डौलाने फडकला 'शिवध्वज'

ब्र.कु. दलिप शेखावत, पिलानी (राज.)

गिर्यारोहण हा एक साहसी खेळ. उंचच उंच डोंगररांगा चढून जाण्यासाठी जसा मनाचा ठाम निश्चय, प्रबळ आत्मविश्वास हवा, उत्तम शारीरिक क्षमता हवी तसंच योग्य प्रशिक्षणही हवं. माउंट एव्हरेस्ट हे हिमालयातील सर्वोच्च शिखर पादाक्रांत करणं हे तर प्रत्येक गिर्यारोहकाचं स्वप्न असतं. माझं हे स्वप्न पूर्ण झालं तो सोनेरी दिवस होता १६ मे २०१९. नेपाळमधील दक्षिण दिशेकडून चढाई सुरू करून पहाटे ५ वाजता मी माउंट एव्हरेस्टच्या शिखरावर उभा होतो आणि हातात होता सोनेरी लाल किरणांनी झगमगणारा माझ्या प्रिय शिवबाबांचा झेंडा 'शिवध्वज'. अनेक वर्षांचा राजयोगाचा अभ्यास, मोहिमेची काटेकोर आखणी आणि शारीरिक क्षमता वाढविण्यासाठी घेतलेली मेहनत, कसून केलेला सराव याचं फलित म्हणजे ८८५० मीटर उंची असलेलं हे शिखर सर करणाऱ्या मोजक्या लोकांच्या यादीत माझ्याही नावाची नोंद झाली. काठमांडू इथून एप्रिलच्या पहिल्या आठवडयात सुरू केलेली ही मोहीम संपवून परत येण्यासाठी ५० दिवसांचा कालावधी लागला.

माझा आध्यात्मिक दिनक्रम व स्वयंशिस्त

रोज ब्राह्ममुहूर्तावर अर्थात अमृतवेळेला ४ वाजता उठून मी राजयोग ध्यान करतो.प्रसन्न वातावरणातून मिळणारे पवित्र तरंग मला दिवसभरासाठी उर्जा पुरवतात त्यामुळे मी शांत, उत्साही राहतो. भावनांवर नियंत्रण ठेऊ शकतो. राजयोगाच्या अभ्यासाने माझ्यातील सुप्त शक्ती(सहनशक्ती, सामावण्याची शक्ती, संकटांना सामोरं जाण्याची आणि योग्य निर्णय करण्याची शक्ती इ. जागृत झाल्याने, आयुष्यात येणाऱ्या प्रत्येक कसोटीसाठी मी सज्ज असल्याचा आत्मविश्वास वाटतो.आजच्या धकाधकीच्या जीवनात वाढत्या सांसारिक जबाबदाऱ्या पेलताना, समाजात वावरताना अनेकांना असुरक्षित वाटतं. अशावेळी एकाजागी आसनमांडी घालून बसणे, एकाग्र होऊन मनाला शांत करण्यासाठी मेडिटेशन करणे ही अशक्यप्राय गोष्ट वाटते.

सामान्य माणसाला दुर्गम अशा हिमालयातील गुहांमध्ये बसून कित्येक योगी, सत्पुरूषांनी वर्षानुवर्षे तप केलं. ईश्वराचं सत्य स्वरूप जाणून घेण्यासाठी कठोर साधना केली. अनेक वर्षांपासून राजयोग करताना, हिमालयातील असे अद्भुतरम्य वातावरण मन:चक्षूंसमोर उभं करून ते अनुभवण्याचा अभ्यास मी करत आलोय. या मोहिमेसाठी प्रत्यक्ष तिथे पोहोचल्यावर, चढाईला सुरूवात करण्याआधी मी आमच्या बेस कँपवर रोज मेडिटेशन करत असे. काहीजण मा. एव्हरेस्टवर चढाई म्हणजे 'हल्लाबोल करणे' असं समजून वागतात. मी मात्र नेहमीच याकडे एक 'तीर्थयात्रा' म्हणून पाहिलं. 'शिखरावर चढाई करून विजय मिळवणे' ही सतत वापरली जाणारी संज्ञासुद्धा या परिक्रमेत निरर्थक ठरते. त्या गिरीराजाशी मला संपूर्ण एकरूप व्हायचं होतं. शिखर सर करून घरी परतायचं, 'तुम्ही करून दाखवलंत, थोर आहात' असं लोकांचं कौतुक ऐकायचं हाच निव्वळ उद्देश माझ्या मनांत नव्हता. तो एक भाग झाला; पण खरंतर आयुष्यातील इतर अनेक गोष्टींप्रमाणेच तुम्हाला काही ऋण फेडावेच लागते. त्याला अग्रक्रम देऊन जाणीवपूर्वक त्या दिशेने पावलं उचलावी लागतात.

तिथे मेडिटेशन करताना सर्वोच्च सत्ता परमात्म्याशी (शिवबाबांशी) मन-बुध्दी जोडून त्यांची पवित्र प्रकंपनं मी

आसपास अनुभवायचो. शिखरावर जाण्याचा मार्ग निर्विघ्न होण्यासाठी मी मनापासून बाबांची आळवणी केली आणि यशस्वीपणे तिथे पोहोचल्याचं दृश्य डोळ्यांपुढे आणलं. घर, नोकरी, संसार या भौतिक जगापासून खूप दूर, निराळ्या वातावरणाशी परिचय घडवणारी माउंट एव्हरेस्टची मोहीम दंत कथेतील वाटाव्या अशा गूढ, प्रसंगी अचंबित करणाऱ्या जगाची कवाडं उघडते. अशा अफाट ध्येयाला गवसणी घालण्यापूर्वी संपूर्ण तयारी करायला हवी. समुद्रसपाटीपासूनची उंची, तिथली विरळ हवा, क्षणोक्षणी बदलणारे हवामान, हिमस्खलन अशा छातीत धडकी भरवणाऱ्या अनेक शक्तिशाली नैसर्गिक अडथळ्यांचा सामना करावा लागतो.

मृत्यूच्या (देवांची हुकुमत असलेल्या) प्रदेशात तर गिर्यारोहकांना खरोखरीच मृत्यू समोर दिसत असतो. प्रचंड थंडी, हवेतील कमी झालेला ऑक्सिजन, शरीरातील पाण्याची पातळी कमी झाल्यामुळे जाणवणारा प्रचंड थकवा यामुळे कित्येक गिर्यारोहक पार मेटाकुटीला येतात. अशा वातावरणात देखील शिवबाबांची शक्ती माझ्याबरोबर सदैव असल्याची जाणीव होत होती. पुढे जाऊन, शिखरावर पोहोचून सुरक्षितपणे माघारी उतरण्यासाठी माझं शरीर अधिक शक्तिशाली बनलं. बरेचदा माउंट एवरेस्ट त्याच्या भीतीदायक लौकिकाला जागतो. ठरलेल्या दिवशी शिखरावर पोहोचून परतत असताना, वातावरण अचानक बदलल्यामुळे आमच्याबरोबरचे दोन गिर्यारोहक नाहीसे झाले. माउंट एव्हरेस्टवर चढाई करण्याची मोहीम सुरू झाल्यापासून सन २०१९ पर्यंत जवळपास ३०९ जणांचा मृत्यू ओढवला असल्याची नोंद आहे. आत्तापर्यंतच्या रेकॉर्डमधे सर्वात वाईट काळ २०१९ मध्ये नोंदला गेला. त्या वर्षी ११ गिर्यारोहकांनी आपले प्राण गमावले.परमात्मा पिता शिवबाबांशी जोडलेल्या आध्यात्मिक नात्यामुळेच त्या सर्वोच्च शिखरावर पोहोचण्याची परवानगी मिळाली व बेस कँपवर मी सुखरूप परतू शकलो असं मला ठामपणे वाटतं.

या अनुभवामुळे माझ्या आयुष्यात झालेला बदल

तुमच्या माझ्या कल्पनेपलीकडे शक्तिशाली असलेले, कोणताही अंदाज बांधता येऊ नये असे पर्वत म्हणजे या भूतलावरचं नवलच आहे.त्यांचं स्वत:चं असं एक विश्व आहे. ते पर्वत दिसामासांनी मोठे होतात, श्वास घेतात, कधी इकडून तिकडे सरकतात तर कधी गुरगुरतात. माउंट एव्हरेस्टनेही माझ्यावर जबरदस्त छाप पाडली. त्याची ती अफाट उंची पाहून आणि जवळपास तीस हजार फुटांवरून सभोवतालचे जग न्याहाळताना मी जागेवरच खिळलो.स्तब्ध झालो. मानव आणि पर्वत यांच्यातील संबंधाचा आवाका समजून घेण्यासाठी या अनुभवाची मोलाची मदत झाली. आयुष्यात येणाऱ्या अडचणींची वर्गवारी करण्याची माझी समजही वाढली.

निसर्गाशी जडलेलं माझं नातं आणि त्याचं महत्त्व

माझ्या वैयक्तिक मानसिकतेनुसार मी स्वत:ला नेहमी एक प्रश्न विचारतो 'मी कोण आहे? माझं खरं स्वरूप काय?' तसं पाहता विश्वाच्या अनंत पसाऱ्यातील मी एक धूलीकणच म्हटला पाहिजे (आत्मा एक अतीसूक्ष्म ज्योतीर्बिंदू आहे) माझा जन्म ही एक अलौकिक घटना होती. निसर्गातील ५ तत्वांनी हे शरीर बनलं आहे, ज्याच्या आधाराने मी (आत्मा) कर्म करतो. या नैसर्गिक तत्वांचा, साधनांचा आपण मान ठेवला पाहिजे. त्यांचं रक्षण करून संवर्धन केलं पाहिजे.

(पान क्र.२५ वर)

(ब्रह्मावत्सांकरिता)

चित्रातून चरित्रनिर्मितीकडे

ब्र.कु. एकता, ठाणे (प.)

नित्य मुरलीतील वरदानाचे चित्ररूप आणि स्पष्टीकरण मागील अंकापासून सुरू केले आहे. यामागे कल्पना अशी आहे–जेणेकरून ऐकलेले वरदान शब्दरूपात लक्षात ठेवताना कठीण वाटत असेल तर चित्ररूपात लक्षात ठेवण्याचा प्रयत्न करावा. चित्र चटकन लक्षात राहते ही मानवी मनाची किमया आहे. म्हणूनच असं म्हणतात, एक चित्र हजार शब्दांचे काम करते. खालील वरदानाच्याद्वारे अभ्यास करूया.

वरदान – आपल्या स्वरूपाद्वारे भक्तांना आभामंडळाचा अर्थात् प्रकाशाच्या मुकुटाचा साक्षात्कार करवणारी इष्ट देवता भव ।

स्पष्टीकरण – जेव्हापासून तुम्ही परमात्मा शिवाची म्हणजे शिवबाबांची खऱ्या अर्थाने मुले झालात, पवित्रतेची प्रतिज्ञा केलीत तेव्हापासून प्रतिज्ञेच्या मोबदल्यात आभामंडळ प्राप्त झाले आहे. (चित्रात डावीकडच्या मानवाकृतीच्या डोक्यावर शिवबाबांच्या शक्ती आणि गुणांची वृष्टी होताना दाखवले आहे). या आभामंडळाच्या प्राप्तीसमोर रत्नजडित मुकुटही फिका पडावा असा याचा महिमा आहे. जितकं आपण संकल्प, वाणी आणि कर्मात पवित्रता धारण करू तितकं आभामंडळ स्पष्ट होत जाईल आणि भक्तांच्या समोर तुमचे इष्ट देवता रूप प्रत्यक्ष होत जाईल. संपूर्ण देवत्व प्राप्त केलेली स्थिती आणि समोर याचना करणारा भक्त उजव्या भागात दिसत आहे.

पवित्रतेची प्रतिज्ञा म्हणजे काय? संपूर्ण पवित्रता अर्थात् मन, वाणी, कर्म आणि स्वप्न यात कुठेही पवित्रतेचे



व्रत भंग होता कामा नये. नुसतं ब्रह्मचर्य नव्हे तर ब्रह्माचारी म्हणजे प्रत्येक कर्मात ब्रह्माबाबांसारखे आचरण. अशा व्रताची जो धारणा करतो तो खऱ्या अर्थाने ब्राह्मण. नुसतं जन्माने ब्राह्मण तर अनेक आहेत; पण कर्माने ब्राह्मण होणे आवश्यक आहे. असे व्रत धारण करणे म्हणजे शिवपुत्र बनणे होय. देह आणि देहाशी संबंधित व्यक्ती व पदार्थांच्या आकर्षणापासून बुद्धीद्वारे दूर परमधामात शिवबाबांशी योग साधण्याने सर्व शक्ती व गुणांची प्राप्ती होते. याचा सुपरिणाम म्हणजे आपले आभामंडळ विकसित होत जाते. विकसित आभामंडळाद्वारे अनेक भक्त मंडळींना त्यांच्या इष्ट देव–देवतेचा साक्षात्कार होऊन त्यांची मनोकामना पूर्ण करता येईल. इतका व्यापक अर्थ या चित्रात दडला आहे.

***



‘विदेहीपणे मुक्ती भोगीत जावी’

ब्र.कु. प्रदीप, बी. के. कॉलनी, आबू रोड

भक्तिमार्गात किंवा तत्त्वज्ञानाच्या प्रांतात मोक्ष, मुक्ती अशा काही संकल्पना येतात. त्यावर अनेकानेक ग्रंथ किंवा पानेच्या पाने भरभरून लिहिली गेली आहेत. त्यातल्या ‘मोक्ष’ या विषयावर आज न बोलता ‘मुक्ती’ या विषयावर आपण प्रकाश टाकूया. **मुक्ती म्हणजे आध्यात्मिक पातळीवर विचार केल्यास असे लक्षात येते – विकारांपासून मुक्ती, स्वतःतल्या वाईट गोष्टी किंवा कमतरतेपासून मुक्ती. जीवनभर जर अशा मुक्तीसाठी पुरुषार्थ म्हणजेच आध्यात्मिक यत्न केले तर देहत्यागाचे वेळी देहापासून सहज सुटका होते. ‘मी आत्मा आहे,देह नाही’ या स्मृतीचा गहन अभ्यास असेल, नुसते वरकरणी ज्ञान नव्हे, तर अंतिमकाळी देहापासून आत्मा सहज मुक्त होतो. जिवंत असताना जर का अशा आत्मभानाचा सखोल अभ्यास असेल तर प्रत्यक्ष मृत्यूला सामोरे जाताना मन डळमळीत होत नाही.** अशा प्रकारची काही उदाहरणे आपण वाचतो, ऐकतो.

स्वामी विवेकानंदांनी देह त्यागण्यापूर्वी काही दिवस आधी आपल्या एका शिष्याला सहज बोलता बोलता सांगितले, ‘‘माझ्या देह त्यागानंतर अंत्यसंस्कार अमुक जागी करा’’. हे ऐकून तो शिष्य हबकला. ते पाहून स्वामीजी म्हणाले, ‘‘काही नाही तुला फक्त सांगून ठेवतोय.’’ त्यांनी पंचांगावर एका तारखेवर खूण करून ठेवली होती, ती तारीख अर्थात् ४ जुलै १९०२. अगदी त्याच दिवशी त्यांनी देह ठेवला. असेच अजून एक संन्यासी होऊन गेले, ‘स्वामी प्रणवानंद’ प्रणवानंदांनी सर्वांसमोर देह त्याग केला. त्यावेळेस ते म्हणाले, ‘‘हा पहा मी या नश्वर देहास लाथ मारून निघून जात आहे.’’ अध्यात्माच्या इतिहासात डोकवून पाहिले तर अशी अनेक उदाहरणे मिळतील. ब्रह्माकुमारी संस्थेच्या साधकांपैकी काहींनी अशी स्थिती गाठली होती. त्यातील तीन ठळक उदाहरणे देता येतील. ब्र. कु. रमेश भाई, संस्थेचे प्रमुख ‘मॅनेजिंग ट्रस्टी’ होते. आता ते हयात नाहीत; पण त्यांच्या एका लेखाद्वारे ही माहिती देत आहोत. ते आपल्या लेखात म्हणतात,

‘‘आजवर ब्रह्माकुमारी संस्थेत अनेक उच्च कोटीचे साधक होऊन गेले. स्वतः ब्रह्माबाबा अर्थात् लौकिक नाव ‘दादा लेखराज’ यात सर्वात अग्रणी होते. त्यांच्या लौकिक धर्मपत्नी ‘जसोदा’ याही अशाच उच्च कोटीच्या साधक होत्या. त्यांचा त्याग अलौकिक होता. दादा लेखराज यांचा हिऱ्यांचा मोठा व्यापार होता. त्याकाळचे ते जणू नवकोट नारायणच होते. त्यांची पत्नी या नात्याने जसोदा मैय्या (त्यांना प्रेमाने अनेकजण जसोदामैय्या म्हणत) कायम दागिन्यांनी मढलेल्या असायच्या. इतके दागिने अंगावर असत की कर्ण आभूषणांच्या वजनाने त्यांच्या कानाचे भोक मोठे झाले होते. ते दुरुस्त करण्यासाठी एक शस्त्रक्रिया करावी लागली. ही घटना १९३७ च्या आधीच्या काळातील आहे. त्यावेळी किती संपन्न स्थिती होती याची आपणांस कल्पना येईल. जेव्हा परमात्मा शिवाने, दादा लेखराजांना आपले माध्यम बनवून ज्ञान प्रकट करण्यास सुरूवात केली तेव्हा त्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल झाला. त्यांच्या समवेत जसोदामैय्यांनीही आपले जीवन परिवर्तीत केले. दादा लेखराज यांचे कर्तव्यवाचक नाव ‘ब्रह्मा’ झाले व सगळे त्यांना ‘बाबा’ म्हणू लागले. सर्वांप्रमाणे जसोदा मैय्यांनीही आपली दृष्टी बदलली व त्याही बाबा म्हणू लागल्या. इतका मोठा त्याग

क्वचित एखाद्या व्यक्तीच्या जीवनात आढळून येतो. जणू काही जुने नाते गळून पडले व नवीन जन्म झाला. जुन्या नात्यापासून मुक्ती मिळवली आणि आत्मभानाचा उदय झाल्याने त्या विदेही अवस्थेचा आनंद लुटू लागल्या.

काळ पुढे सरकत गेला. जसोदा मैय्यांनी अनेक ठिकाणी ईश्वरी सेवा करत आपले आयुष्य सफल केले. अंतिम काळात त्या मुंबईत होत्या. पोटाचे काही विकार निर्माण झाले होते. पोटात पाणी होत असे व त्यामुळे स्वास्थ्य बिघडत राही. मी त्यांच्या भेटीस जात असे. योगायोगाने त्यांच्या देहत्यागाच्या आदल्या दिवशी मी त्यांना भेटायला गेलो. मला पाहताच त्या म्हणाल्या, ''ये बेटा रमेश. तुला काय खाऊ (टोली) देऊ?'' मी म्हटले, ''माताजी तुमची तब्येत ठीक नाही, तुम्ही आराम करा.'' त्यावर त्या म्हणाल्या, ''अरे कष्ट तर शरीराला आहेत, मी तर आत्मा आहे. या शरीरापासून भिन्न. मला कुठलाही आजार नाही की कष्ट नाही.'' सर्वसाधारण माणसाला आजारी आहोत हे सांगायचीसुद्धा आवश्यकता नसते. त्याच्या चेहऱ्यावरुन किंवा बोलण्यातूनच हे सगळं कळतं; पण माताजींच्या चेहऱ्यावर आजाराचे कुठलेही लक्षण नव्हते. दुसऱ्या दिवशी त्यांनी अत्यंत शांतपणे देह ठेवला.

अशाच प्रकारे 'विश्वकिशोर' भाऊ व ब्रह्माबाबा यांच्यात लौकिक नाते पुतण्या-काकाचे होते. मात्र ब्रह्माबाबांच्या ठायी ज्ञानोदय झाल्यानंतर हे नाते गळून पडले आणि फक्त आध्यात्मिक संबंध उरला. संस्थेच्या कार्यातील मोठा सहभाग 'भाऊ' (त्यांना सगळे प्रेमाने भाऊ म्हणत) उचलत असत. कुठल्याही वस्तूची खरेदी असो, भाऊच त्यात अग्रणी असत. इतके की संस्थेचे पाण्डव भवनचे मुख्यालयही अगदी देहत्यागापर्यंत भाऊंच्या नावे होते. विश्वकिशोर भाऊ वैराग्यशील वृत्तीचे होते. निरलसपणे सर्व कामे निभावित असत. त्यांच्या अंतिम काळात तशी प्रकृतीची कुरबूर नव्हती. मी (स्वतः रमेशभाई सांगत आहेत) आणि विश्वकिशोर भाऊ, पाण्डवभवन आबूहून निघालो. मुंबईला जाण्याकरिता सामान बांधून तयार होते आणि बाबांकडून निरोप घेऊन निघणार तेवढ्यात बाबांनी चंद्रहास दादांना विशेष बोलावून घेतले व फोटो काढायला सांगितला. एरवी फोटो काढून घेणे म्हणजे 'देह बुद्धीत फसणे' अशी शिकवण देणारे बाबा आज आवर्जून फोटो काढायला सांगतात हे आश्चर्यच म्हणायचे. मी आणि विश्वकिशोर भाऊ गाडीत बसल्यावर भाऊंनी मला सांगितले, ''माझं या देहाद्वारे असलेलं कार्य पूर्णत्वास जात आहे. बाबांसोबत माझं सविस्तर बोलणं याविषयी झालं आहे. पुढील कार्याकरिता मी नवे देहरूपी वस्त्र धारण करून भूमिका बजावणार हे सुनिश्चित आहे.'' मी पाहत होतो, ''भाऊ अतिशय शांत व स्थिरचित्त होते. त्यानंतर मुंबईत पोहोचल्यावर भाऊंच्या बाबतीत एका शस्त्रक्रियेचे निमित्त घडले व त्यानंतर पाचव्या दिवशी भाऊंनी 'वासांसि जीर्णानि' या न्यायाप्रमाणे शांत चित्ताने देह त्यागला.

अशीच एक प्रेरणादायी व्यक्ती म्हणजे दादी पुष्पशांता. दादीजी मुंबईतल्या कुलाबा सेवाकेंद्रावर राहून ईश्वरी सेवा करत होत्या. दीर्घकालीन हृदयविकाराचे निमित्त घडले होते. माझ्या बहिणीने (डॉ. अनिला) दादीजींना हॉस्पिटलमध्ये घेऊन जाण्याविषयी सांगितले. त्यावेळी दादीजी, सेवाकेंद्रावर असलेल्या ध्यानकक्षात जाऊन आल्या आणि म्हणाल्या, ''मी परमेश्वराकडून रजा घेतली आहे. मी आता हा देह सोडणार आहे.'' कबिरांचा एक दोहा आहे, त्याची आठवण होते -

चतुर अलबेली कर ले शृंगार
तुझे साजन के घर जाना है।

दादीजींना रात्री हॉस्पिटलमध्ये नेले. दुसऱ्या दिवशी सकाळची नित्यसाधना, ज्ञानमुरली श्रवणही त्यांनी केले. सकाळी सुमारे ७.३० वाजता त्यांनी सोबत असलेल्या बहिणीला मोहिनीबेनला सूचना केली - 'जा, हॉस्पिटलमधल्या कर्मचाऱ्यांना ईश्वरी कार्याचा परिचय देऊन ये' ती बहीण ८ वाजून दहा मिनिटांनी त्यांच्या खोलीत परत आली तेव्हा दादीजी म्हणाल्या, ''मी साडे आठ वाजता शरीर सोडेन तोपर्यंत सांगितलेली सेवा तू सुरूच ठेव. ८.२५ ला बहीण परत खोलीत आली तेव्हा दादीजींनी

सगळ्या डॉक्टर्स व परिचारिकांना बोलावले. त्यांना सांगितले, ''मी आता परमेश्वराकडे चालले. तुम्ही सर्वांनी मिळून या देहाची खूप काळजी घेतलीत. तुम्हा सगळ्यांचे मनापासून आभार!'' आणि बरोबर ८.३० वाजता त्यांनी देह त्यागला.

आत्म्याची इतकी हुकूमत / अधिकार असावा! जणू काही ताज्या लोण्यातून एखादा धागा सुलभपणे बाहेर काढता यावा तद्वत.

ही आहे खऱ्या अर्थाने मुक्तीची अवस्था उपभोगणे. जोपर्यंत जीवन आहे तोवर कुठल्याही मोहमायेचे पाश आत्म्यास बाध्य करू शकत नाहीत म्हणजेच मुक्तीची अवस्था आहे. कुठल्याही विकारांचा स्पर्श नाही हीच खरी मुक्तावस्था. समर्थ रामदासांनी मनाच्या श्लोकांत म्हटले आहे त्यानुसार 'देहेबुद्धिचा आठवू नाठवावा' म्हणजे अंतिम काळी देहाचे आकर्षण जराही आत्म्याला आकर्षित न करणे हीच विदेही स्थितीची परमोच्च अवस्था होय. प्रत्येक साधकाने अशा मोह नष्ट स्थितीचेच ध्येय ठेवून आध्यात्मिक वाटचाल केली पाहिजे.

***

(पान क्र. १५ वरून)

त्रिवेणी संगमानेच होईल परमात्म सुखाची निखळ वृष्टी.

हा आहे योगाचा एक साधा प्रयोग – बघा तर खरं किती सुखद अनुभव येतो. रोज सकाळी उठल्यावर मनावर एक छोटीशी गोष्ट ठसवा. मी सर्वश्रेष्ठ परमात्म्याचे लाडके संतान आहे. छोटं लेकरु आहे. बालपण किती रम्य असतं की नाही? ''बालपणीचा काळ सुखाचा'' असं वर्णन करतात. संसारातल्या सगळ्या अडचणी, चिंता, दुःख याची जाणीव तरी असते का त्या बालकाला? नाही ना! म्हणून तर तुकाराम महाराज म्हणतात, ''व्हावे लहानाहुनि लहान'' बाळाला फक्त माहिती आहे – आई–बाबा. परमश्रेष्ठ परमात्मा माझे 'मायबाप' आहेत ही जाणीवच दिवसभरात येणाऱ्या कडूगोड प्रसंगात सुखदायी ठरेल.

मग काय – होऊया लहान आणि देऊया रोज सकाळी आपला बुद्धिरूपी हात त्या पारलौकिक मातापित्यांच्या हातात. जर दिवसभरात दुःखाचे चटके लागणार असले ना तरी चिंता करायला आहे की परमात्मा!

***

(पान क्र. २१ वरून)

समारोप

मी अजूनही मनाने माउंट एव्हरेस्टवरच आहे. खाली आलेलोच नाही. या मोहिमेच्या आखणीपासून प्रशिक्षण आणि प्रत्यक्ष चढाई करेपर्यंत, प्रत्येक टप्प्यावर मला प्रोत्साहन देणारे माझे वडील श्री. नथूसिंग शेखावत यांचा मी ऋणी आहे. प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या राजस्थानमधील पिलानी सेवाकेंद्राच्या बी. के. आशा दीदी व स्वाती दीदी यांनी मोठया विश्वासाने, माउंट एवरेस्टवर फडकविण्यासाठी 'शिव ध्वज' माझ्या हाती सोपवला याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. तसंच मी सेवा करत असलेल्या कॅनेडियन लष्करातील 'रॉयल विनिपग रायफल्स' येथील सर्वांच्या पाठिंब्याबद्दल धन्यवाद देऊ इच्छितो.

यापुढेही राजयोग मेडिटेशनच्या अभ्यासाने वाटेत येणाऱ्या अडथळ्यांना दूर करून मी प्रवास सुरूच ठेवणार आहे. त्याबरोबरच समाजोपयोगी कामांसाठी निधी उभारण्याचाही माझा संकल्प आहे.विज्ञानाने सगळं जग जवळ आलंय. नवीन पिढीसमोर आदर्श निर्माण होईल असं जीवन घडवण्याचा माझा नम्र प्रयत्न असेल. शेवटी एवढचं म्हणावंस वाटतं 'समोर येणारं प्रत्येक आव्हान खरंतर मोठं नसतं. राजयोग मेडिटेशनचा अभ्यास, स्वयंशिस्त आणि हाती घेतलेल्या कार्यात पूर्णपणे झोकून देऊन ते यशस्वी करण्याचा ध्यास असेल तर आपण सगळे अशक्य तेही शक्य करून दाखवू शकतो.'

(भावानुवाद : ब्र.कु. अर्चना, ठाणे, पश्चिम)

***

ब्रह्माकुमारी संस्थेचा रशियातील सत्संग

ब्र. कु. संतोष, सेंट पीटर्सबर्ग, रशिया

ब्र. कु. संतोषदीदी, वरिष्ठ बहिणींपैकी एक आहेत. गेली ३५-४० वर्षे समर्पित जीवन व्यतित करीत आहेत. ईश्वरी मार्गावरील समर्पित जीवनाची सुरूवात त्यांनी दिल्ली, राजौरी गार्डन सेवाकेंद्रावर केली व पुढे भाग्यवश रशियात जाऊन सेवा करीत आहेत. त्यांचा अनुभव शब्दांकित करून देत आहोत. वाचकांना नक्कीच प्रेरणादायी ठरेल ही शुभ आशा आहे.

ब्रह्माकुमारी संस्थेच्या इतिहासात परदेशात ईश्वरी ज्ञानप्रसाराचे कार्य १९७२ पासून सुरू झाले; पण खऱ्या अर्थाने जोमात कार्यगती आली १९७४ पासून. लंडनपासून सुरूवात झाली आणि रशियापर्यंत पोहोचायला १९८८-८९ साल उजाडावे लागले. अव्यक्त बापदादांनी विदेशी भाऊ-बहिणींबाबत नेहमीच गौरवोद्‌गार काढले आहेत. 'विदेशी मंडळी अत्यंत निर्मळ अंतःकरणाची व स्वच्छ हृदयाची माझी मुले आहेत' असे बापदादांनी म्हटले आहे आणि त्याचा प्रत्यय येतो. या ईश्वरी ज्ञान मार्गावर चालायचे असेल तर सत्यता आणि हृदयाची निर्मळस्थिती सर्वात मोठे रत्न किंवा हिरा आहे असे म्हणायला हवे. इथल्या लोकांमध्ये भारतातील भक्तीसारखी परंपरा नाही, देव-देवतांच्या संस्कृतीचा गंध नाही; तरी आता या ईश्वरी मार्गावर ते चालत आहेत हेच एक आश्चर्य म्हणावे लागेल.

१९८९ च्या आसपास जेव्हा ईश्वरी कार्याची रशियात सुरूवात झाली. त्या काळातील काही आठवणी आहेत. यथावकाश आपली संस्था रजिस्टर्ड झाली आणि रशियन सरकारने, संस्थेला जमीन विकत घेऊन बांधकाम करायला व संस्था चालवायला परवानगी दिली. सेंट पीटर्सबर्ग हे रशियातील एक प्रसिद्ध शहर आहे. इथे आपली शाखा उघडण्याचे प्रयत्न सुरू झाले. सुनिश्चित केलेल्या जमिनीची पाहणी करण्यास दादी जानकीजी स्वतः येऊन गेल्या होत्या. त्या दरम्यान रोज येऊन ज्ञान श्रवण करणारे नियमित विद्यार्थी ३००-३५० झाले होते. त्यातील ७०-८० जण एंजिनिअर्स किंवा आर्किटेक्ट होते. सभेत बसल्यावर दादीजींनी मला विचारले, ''यात कुणी सुतार आहे का? त्याला उभं करून माझ्याशी गाठ घालून दे.'' मी त्यानुसार एका भावाची ओळख करून दिली ते पाहून दादीजींनी त्याला प्रेरणा दिली, एका दिवसात बाबांच्या घरी ज्याला धन सफळ करायचे आहे त्याच्यासाठी 'बाबा की भण्डारी' अर्थात दानपेटी बनवायला सांगितली. ज्या कुणास गुप्तपणे काही सहकार्य करायचे असेल तो करू शकतो याकरिता ती सोय होती. स्वतः दादीजींनी लंडन सेवाकेंद्रातर्फे काही सहयोग देऊन शुभमुहूर्त केला. दुसऱ्या दिवशी दादीजी निघण्यापूर्वी सगळ्यांना यज्ञप्रसाद (टोली) देण्याकरिता बसल्या. ज्याने त्याने आपापल्या कुवतीनुसार आणि इच्छेनुसार फूल ना फुलाची पाकळी सफळ केली. नंतर आम्ही पेटी उघडली आणि पाहत गेलो तर एक छोटीशी पुडी होती. त्याच्या आत अजून एक पुडी आणि त्याच्या आत अजून एका पुडीत एक सोन्याचा दात होता. ज्या कुणी अनामिक मनुष्यात्म्याने आपल्या भावनेनुसार, जे स्वतःकडे आहे, ते ईश्वरी कार्यात लावलेले पाहून बाबांविषयीचे अपार प्रेम

दाटून आले. तोपर्यंत माझ्या मनाची आंदोलने चालत. असे वाटे की थोडा काळ आपण इथे सेवा करून भारतात परत जायचेच आहे.

अशाप्रकारे सेवाकेंद्राची निर्मिती वेगाने होत राहिली आणि बांधकामातही 'सिटी आर्किटेक्टच्या दोन विद्यार्थिनी, आपल्या सेवाकेंद्राशी जोडल्या गेल्या होत्या. त्यामुळे अनेक कामे सहज होत होती. अनेकवेळा ज्ञान मुरलीत उल्लेख येतो. तुम्ही गच्चीवर बसून अमृतवेळेस तपस्या करा. मी क्लासच्या भाऊ-बहिणींशी इमारतीचा आराखडा निश्चित करताना म्हटले, ''त्यात गच्ची (टेरेस) कुठे आहे? बाबा ज्ञानमुरलीत सांगतात त्याप्रमाणे आपल्याला गच्ची नको का ठेवायला?'' संबंधित एंजिनियर्स म्हणाले, 'इथे तसा कायदाच नाही बांधकामाच्या इथल्या नियमानुसार गच्ची बांधू शकत नाही. थंडीत प्रचंड बर्फ पडतो त्यामुळे उतरत्या छपराचीच बांधणी करावी लागते.' मला त्यांचे म्हणणे मान्य होते; पण मनांत हेही ठाम होते की साक्षात् परमेश्वराचे वचन पालन करायचे तर तशी गृहनिर्मिती शक्य आहे. म्हणूनच तर तो आपल्याला सांगतो. मी म्हटले, ''काही हरकत नाही, तुम्ही विचारून तर पहा.'' हो-नाही करता-करता आमचे इंजिनिअर्स तयार झाले आणि काय आश्चर्य! सिटी आर्किटेक्टने परवानगी दिली. अट एकच-बर्फ जमा होऊ देणार नाही याची हमी सरकारला दिली पाहिजे. आम्ही ती तात्काळ दिली आणि टेरेस बांधली गेली. म्हणतात ना, इच्छा तिथे मार्ग!

'घर पहावे बांधून' असेही म्हटले जाते. त्यानुसार बांधकाम हाती घेतल्यावर खर्च वाढतच जातो असा अनुभव अनेकांचा असतो. बाबांचे घरही या अनुभवास अपवाद नव्हते. साधारण साठ टक्के काम पूर्ण झाले होते; पण पुढे आर्थिक चणचण दिसू लागली होती. ते पाहून मी सुचविले, आपण काही गोष्टी लांबणीवर टाकू आणि काही गोष्टीत थोडी तडजोड करूया. मात्र क्लासचे भाऊ-बहिणी तयार नव्हते. त्यांनी आठ दिवसांची मुदत मागितली माझ्याकडे. काय करावं त्यांनी? क्लासमध्ये येणाऱ्यांपैकी अनेकजण निवृत्त मंडळी आहेत. बऱ्याच माताही आहेत. त्यातल्या काही तर एक-एकट्या राहतात. त्यांनी युक्ती केली आणि आपसांत एक-दोन किंवा तीन जण मिळून राहायचे ठरविले. जेणेकरून वयोमानापरत्वे एकटे राहायलाही नको, एकमेकांचा आधारही मिळेल. आणि राहत्या जागेस चांगली किंमत येत आहे हे पाहून ती विकली व त्यातून काही धनराशी उभी केली अशा वेगवेगळ्या प्रकारे भाऊ-बहिणींनी या कार्यात उत्साहाने सहभाग घेतला आणि बाबांचे सेवाकेंद्र उभे राहिले.

या कार्यात अजून एक उल्लेखनीय गोष्ट म्हणजे आम्ही योगकक्ष वेगळा आणि मोठा असावा अशी इच्छा बाळगून होतो. किती मोठा? तर क्लासचे सगळे विद्यार्थी, १५०-२०० लोक बसू शकतील इतका. योगकक्ष म्हणजे बाबांची खोली, तीच बाबांच्या मुलांची खोली. ईश्वर पित्याच्या या खोलीत सगळ्यांना एकत्र बसून योग करता यावा ही शुभेच्छा होती. त्याचबरोबर आम्ही एक संकल्प केला होता की हा कक्ष म्हणजे शांतीकुण्ड बनला पाहिजे. याच्या बांधकामात ज्यांचा हातभार लागेल ते कामगारही व्यसनी, छंदी-फंदी नकोत. अशा माणसांद्वारेच हे घडावे नाहीतर क्लासचे भाऊ-बहिणीच जसं जमेल तसं हळूहळू बांधतील. जर आपला भाव शुद्ध असेल तर बाबांची इतकी मदत मिळत जाते, कंत्राटदाराच्या कामगारांपैकी चारजण आमच्या अटीनुसार काम करायला तयार झाले. 'मांसाहार, बिडी-काडी, भांडणे या सगळ्यापासून आम्ही दूर राहून बांधकाम करू' असे अभिवचन त्यांनी दिले आणि ते पाळले. पाहता-पाहता योगकक्ष उभा राहिला आणि त्याचे नामकरण झाले 'विश्वकल्याणकारी'.

रशियन सरकारचे आपल्या सेवाकेंद्राच्या कारभारावर अत्यंत बारीक लक्ष तेव्हाही होते आजही आहे. अनेक सरकारी अधिकारी येऊन जातात, पाहणी करतात. त्यांना वाटे, या संस्थेला रशियाच्या बाहेरील धनाढ्य देशांकडून अर्थसाह्य मिळत असावे. पण आपल्या संस्थेचा कारभार स्वच्छच आहे. आमची मिळकत म्हणजे रशियातील भाऊ-बहिणींनी उभे केलेले धनच होते. सरकार सोबत रशियन

चर्चनाही वाटे, हे आम्हाला ख्रिश्चन धर्माच्या शिकवणुकीपासून परावृत्त तर करू पाहत नाहीत ना! धर्मांतरणाचा छुपा डाव तर नाही ना? विश्वकल्याणकारी योगकक्षाला भेट देण्याचे निमंत्रण चर्चच्या धर्मगुरूंनीही स्वीकारले. त्यांनाही गहन शांततेचा अनुभव येऊ लागला. इतकेच नाही तर त्यांनीही आश्चर्य व्यक्त केले की आम्हीसुद्धा चर्चच्या दुरुस्तीसाठी इतका निधी उभा करताना बरीच दगदग करतो; पण तुमचे कार्य सुरळीत कसे काय होते? मी त्यांना उत्तर दिले, ''अत्यंत मनापासून आम्ही समजतो हे कार्य परमपिता परमात्म्याचे आहे. त्याच्या पैशातून हे घडते, बाकी सगळे निमित्त मात्र आहे. तुम्हीही चर्चमध्ये असलेले दानपात्र त्याचे (ईश्वराचे) आहे हे सखोलपणे मानून कार्य करून बघा, तुम्हालाही अनुभव येईल. खरोखरीच त्यातल्या एका धर्मगुरुंचा एका महिन्यात फोन आला आणि त्याला मनोवांछित फलप्राप्ती होऊ लागली.

रशियन सरकारची बारीक नजर असण्यामागे अजून एक कारण होते त्यांना वाटे, इथे लोकांना धर्म, अध्यात्म या नावाने फसवून रशियातून पैसा बाहेर घेऊन जाण्याचा तर छुपा हेतु नाही ना! पण इथल्या भाऊ-बहिणींनी स्वतःची मिळकत ईश्वरी कार्यात सफळ केली आहे. स्थावर जंगम मालमत्ता तर त्याच देशांत आहे. लोकं शांततापूर्ण पद्धतीने येतात. राजयोगाची साधना करून जीवन सुधारतात हे त्यांनी प्रत्यक्ष पाहिले आहे. **आजमितीस जवळजवळ ३० वर्षे मी येथे सेवा करत आहे. माझ्या व्यतिरिक्त एकही भारतीय व्यक्ती नाही, सर्व स्थानिकच आहेत. शिवबाबा आपल्याला जे उच्च आध्यात्मिक शिक्षण देतात ते आपण जीवनात धारण केले तर त्या धारणाच सेवा करतात. भाषा, प्रांत, वर्ण, भौगोलिक परिस्थिती ही बंधने गळून पडतात आणि जाणवतं-आपण फक्त शुद्ध अंतकरणाने बाबांच्या श्रीमतावर चालायचे असते. त्यात सूर फुंकून उत्तम संगीत तोच निर्माण करू जाणे. माझ्यासारखे अनेक अनुभव आपल्या गाठीशी देखील असतील. माझ्याकडच्या पुंजीतील काही मोजके अनुभव आपल्यासमोर ठेवताना मनोमन आनंद झाला.**

(शब्दांकन – ब्र. कु. महेश, पनवेल)

***

प्रपत्र ४ : अमृतकुंभ द्वैमासिकाविषयीचे निवेदन

१) प्रकाशन स्थळ : प्रजापिता ब्रह्माकुमारीज् लाईट हाऊस, वागळे इस्टेट, ठाणे (प.) ४००६०४

२) प्रकाशनाचा अवधी – द्वैमासिक

३) मुद्रकाचे नाव – बी. के. गोदावरी
राष्ट्रीयत्व : भारतीय

अ) भारताचे नागरिक आहेत का? होय
मुद्रणस्थळाचा पत्ता : परफेक्ट प्रिंटस्, २२, इंडस्ट्रियल इस्टेट, नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे (प.) ४००६०१

४) प्रकाशकाचे नाव : बी. के. गोदावरी
राष्ट्रीयत्व : भारतीय

अ) भारताचे नागरिक आहेत का? होय
पत्ता : द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्, ए-१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी, कोपरी कॉलनी, ठाणे (पू)-४००६०३

५) संपादकाचे नाव : ब्र. कु. सचिन उपाध्ये
राष्ट्रीयत्व : भारतीय

अ) भारताचे नागरिक आहेत का? होय
पत्ता : १०२, सीताराम भुवन, भास्कर कॉलनी, नौपाडा, ठाणे (प.) ४००६०२ महाराष्ट्र

६) मालकाचे नाव व पत्ता : प्रजापिता ब्रह्माकुमारीज ईश्वरीय विश्व विद्यालय, माऊंट आबू (राजस्थान)
मी बी. के. गोदावरी, असे प्रमाणित करते की माझ्या ज्ञानानुसार वरील माहिती सत्य आहे

(बी. के. गोदावरी)
प्रकाशक, अमृतकुंभ

नागठाणे – १०० विश्वविक्रम करणाऱ्या डॉ. ब्र.कु. सुवर्णा यांना अमेरिकेच्या ग्लोबल पीस युनिव्हर्सिटी तर्फे 'वूमन ऑफ द नेशन' या पुरस्काराने सन्मानीत करताना राजयोगिनी ब्र.कु. संतोष दीदी व अन्य मान्यवर

लातूर– १४ वा राज्यस्तरीय उर्जा व संवर्धन पुरस्कार प्राप्त करणाऱ्या ब्र.कु. नंदा व ब्र.कु. पुण्या

अहमदनगर – १०० पेक्षा जास्त विश्वविक्रम करणारे डॉ. ब्र.कु. दीपक हरके यांचे नाव जगविख्यात फोर्ब्स मासिकात झळकले, त्याची प्रत वरिष्ठ समाजसेवक भ्राता अण्णा हजारे यांना देताना डॉ. ब्र.कु. दीपक

Registration No. : MAHMAR/2007/21914

माउंट आबू – १८ जानेवारी – पिताश्री ब्रह्माबाबांच्या स्मृतीदिनानिमित्त श्रद्धांजली वाहतांना राजयोगिनी ब्र.कु. रतनमोहिनी दादी, राजयोगिनी ब्र.कु. इशू दादी, राजयोगी ब्र.कु. बृजमोहन भाई

सायन – अमेरिकेच्या ग्लोबल पीस युनिव्हर्सिटीतर्फे भ्राता अँड्र्यू टेलर यांचे हस्ते महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, तेलंगाना व गोव्याच्या संचालिका राजयोगिनी ब्र.कु. संतोष दीदी यांना समाजसेवा क्षेत्रातील योगदानाबद्दल डॉक्टरेट पदवी देताना